



# गोदातीर समाचार

संपादक : केशव घोणसे पाटील

www.godateer.com

RNI No.6331/62

REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026





* वर्ष ६४ वे * अंक ११७ * नांदेड * रविवार, दि. ४ मे २०२५ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎ : 255777, Fax :252211

## पहलगाम हल्ला : एनआयएकडून ३ हजार लोकांची चौकशी, १०० ठिकाणी छापे

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा तपास एनआयए करत आहे. संपूर्ण टीम श्रीनगरमध्ये कॅम्पिंग करत आहे. तपास यंत्रणेचे महासंचालक आज श्रीनगरहून दिल्लीला परंतू शकतात, असे मानले जात आहे. त्यानंतर ते गृह मंत्रालयाला आपला अहवाल सादर करतील. एनआयएने हल्ल्याशी संबंधित ३००० हून अधिक संशयितांची चौकशी करण्यात आली आहे. तसेच महत्वाच्या १०० ठिकाणांवरही छापे टाकले आहेत. त्यामुळं दहशतवादी नेमके कसे पहलगाममध्ये पोहोचले याची माहिती मिळणार आहे.



एनआयएचे महासंचालक (डीजी) सदानंद दाते हे पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा प्राथमिक अहवाल गृह मंत्रालयाला सादर करतील. केंद्र सरकार या हल्ल्याबाबत अत्यंत गंभीर आहे आणि तपास यंत्रणांना सर्व पैलूंची सखोल चौकशी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या प्रकरणाची चौकशी करणाऱ्या एनआयए पथकाने पीडित कुटुंबांचे जबाबही नोंदवले होते. त्यांच्या भेटीदरम्यान, एनआयएचे महासंचालक यांनी बैसरन व्हॅलीला भेट दिली आहे. घटनास्थळी तपासाच्या प्रगतीचा आढावा घेतला. त्यांनी स्थानिक अधिकाऱ्यांसोबत एक उच्चस्तरीय बैठकही घेतली. या बैठकीत, सध्याच्या सुरक्षा परिस्थितीचा आढावा घेण्याबरोबरच, गुप्तचर यंत्रणा मजबूत करण्यावर आणि सामायिक माहितीची चांगली देवाणघेवाण करण्यावर विशेष भर देण्यात आला.

दरम्यान, जम्मू आणि काश्मीर पोलिस, लष्कर आणि इतर सुरक्षा एजन्सींनी संयुक्त कारवाई सुरू केली आहे. अटक केलेल्या ओव्हरग्राउंड कामगारांशी (ओजीडब्ल्यू) संबंधित सुमारे १०० लपण्याच्या ठिकाणांवर छापे टाकले. छाप्यादरम्यान, बंदी घातलेल्या दहशतवादी गट अल-उमर मुजाहिदीनचा संस्थापक मुश्ताक अहमद जरगर उर्फ लातराम यांच्या घराचीही झडती घेण्यात आली. झरगर हा तोच दहशतवादी आहे जो १९९९ मध्ये इंडियन एअरलाइन्सच्या विमान आयसी-८१४ च्या अपहरणानंतर सोडण्यात आला होता.

एनआयए आणि जम्मू आणि काश्मीर पोलिसांनी आतापर्यंत ९० ओजीडब्ल्यू विरुद्ध यूएपीए अंतर्गत गुन्हे दाखल केले आहेत, तर सुमारे ३००० संशयितांची चौकशी करण्यात आली आहे. या हल्ल्यामागे एक खोल कट आहे, ज्याचे थर हळूहळू उघड होत आहेत, असे तपास यंत्रणांचे मत आहे. या अहवालाच्या आधारे केंद्रीय गृह मंत्रालय भविष्यातील रणनीती ठरवेल आणि सुरक्षा व्यवस्था आणखी कडक करण्यासाठी सूचना जारी करू शकते.

२२ एप्रिल रोजी पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी हल्ला केला होता. यामध्ये २६ जणांची गोळ्या घालून हत्या केली होती. ही घटना घडवून आणल्यानंतर दहशतवादी पळून गेले होते. या घटनेनंतर एनआयएनेही हल्ल्याचा तपास सुरु केला. एनआयए अधिकाऱ्यांनी या घटनेत मृत्युमुखी पडलेल्यांच्या कुटुंबीयांशीही बोलले आणि त्यावेळी ते त्यांच्यासोबत होते. दहशतवाद्यांनी पर्यटकांना का लक्ष्य केले आणि त्यामागील त्यांचा हेतू काय होता, या घटनेच्या तळाशी जाण्याचा तपास पथक प्रयत्न करत आहे.

## 'श्री लईराई' जत्रेदरम्यान चेंगराचेंगरी, ७ जणांचा मृत्यू

**पणजी (प्रतिनिधी)–** गोव्यातील श्रीगाव येथील लईराई देवी मंदिरात चेंगराचेंगरी झाली. या चेंगराचेंगरीत जवळपास ७ जणांचा मृत्यू झाला आहे. तर ७० हून अधिक लोक जखमी झाले आहेत.

शुक्रवारी रात्री गोव्यातील शिरगाव येथे आयोजित श्री लईराई जत्रे दरम्यान एक दुर्दैवी घटना घडली आहे. येथील लईराई मंदिरात झालेल्या चेंगराचेंगरीत ७ जणांचा मृत्यू झाला, अनेक जण गंभीर जखमी झाले आहेत.जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. अचानक गर्दी झाल्याने ही दुर्दैवी घटना घडली आहे, ज्यामुळे लोक जीव वाचवण्यासाठी इकडे तिकडे धावू लागले. चेंगराचेंगरीदरम्यान परिस्थिती अत्यंत भयावह बनली आणि लोक एकमेकांवर पडून बाहेर पडण्याचा प्रयत्न करत असल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. घटनेची माहिती मिळताच पोलिस आणि आपत्कालीन सेवा घटनास्थळी पोहोचल्या आणि मदत आणि बचाव कार्य तात्काळ सुरू करण्यात आले होते.

## पुरंदरमध्ये राडा; विमानतळवरुन शेतकरी आणि पोलीस आमनेसामने

### लाठीचार्जमध्ये महिलेचा मृत्यू

**पुणे (प्रतिनिधी)–** पुरंदर तालुक्यात होत असलेल्या आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी लागणाऱ्या जमिनीचा ड्रोन सर्वे शासनाकडून करण्यात येतोय. मात्र बाधित सातही गावातील शेतकऱ्यांनी या ड्रोन सर्वेला विरोध केला आहे. शेतकऱ्यांच्या मनात रोष वाढतच चालला आहे. याच रोषातून शनिवारी आंदोलक शेतकरी आणि पोलीस आमनेसामने आले. यावेळी शेतकऱ्यांनी पोलिसांशी हुज्जत घातली. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनी लाठीचार्ज केला, या मारहाणीत एका महिलेचा मृत्यू झाला आहे. पोलिसांनी केलेल्या लाठीचार्जमुळे महिलेचा मृत्यू झाल्याचा आरोप गावकऱ्यांनी केला आहे. या घटनेमुळे परिसरात तणावाचे वातावरण आहे. तसेच मोठा फौजफाटादेखील तैनात करण्यात आला आहे.

पुरंदरच्या विमानतळासाठी सुरू असणाऱ्या ड्रोन सर्वेला आलेल्या अधिकाऱ्यांना गावातील लोकांनी ड्रोन सर्वे बंद करण्यास भाग पाडलं होतं. यानंतर शनिवारी प्रशासनाच्या वतीने मोठा पोलीस बंदोबस्त मागवण्यात आला होता. ड्रोन्स सर्वे करण्यात येणार होता. मात्र शनिवारी सात गावातील नागरिकांनी या सर्वेला विरोध केला. यानंतर पोलीस आणि आंदोलकांच्या मध्ये झटपट झाली. पोलिसांनी अश्रू धुराचा मारा करत लाठी चार्ज केला. या लाठीचार्जमध्ये कुंभारवळण गावामध्ये एका महिलेचा मृत्यू झाला असून अंजनाबाई कामटे (वर्ष ६०) असे महिलेचे नाव आहे.

या लाठीचार्जमध्ये अनेक जण जखमी झालेले आहेत. तर या लाठीचार्ज दरम्यान एका महिलेचा देखील मृत्यू झाला आहे. यानंतर या परिसरातील लोक आता संतप्त झाले आहेत. दरम्यान प्रशासन आणि पोलीस हे आता या भागातून माघारी गेले असून असून शेतकरी मात्र आक्रमक आहेत. मृत महिलेचा मृतदेह पोलीस स्टेशनमध्येच ठेवणार असल्याचे आंदोलकांकडून सांगण्यात येत आहे.

## पाकिस्तानची आर्थिक नाकेबंदी सुरुच; आयात वस्तूंवर बंदी

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** पहलगाममध्ये झालेल्या पर्यटकांवरील क्रूर दहशतवादी हल्ल्यानंतर भारताकडून कडक कारवाईसाठी पडद्यामागून तयारी सुरु असली, तरी तत्पूर्वी पाकिस्तानची आर्थिक नाकेबंदी सुरुच ठेवली आहे. दोन्ही देशांमधील तणाव वाढत असल्याने भारताने पाकिस्तानमधून येणाऱ्या सर्व वस्तूंच्या आयातीवर बंदी घातली आहे. परराष्ट्र व्यापार महासंचालनालयाने २ मे रोजी एका सूचनेत म्हटले आहे की, ही बंदी तत्काळ लागू होईल. भारत सरकारने परराष्ट्र व्यापार धोरण, २०२३ मध्ये एक नवीन परिच्छेद २.२० अ समाविष्ट केला आहे, ज्यामध्ये पाकिस्तानमधून आयात करण्यावर बंदी असे म्हटले आहे. सर्व वस्तूंची प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष आयात किंवा वाहतूक, मुक्तपणे आयात करता येण्याजोगी असो वा नसो, पुढील आदेशापर्यंत तत्काळ प्रभावाने प्रतिबंधित करण्यात आली आहे. या निर्बंधातील कोणत्याही अपवादासाठी भारत सरकारची पूर्व परवानगी आवश्यक असेल, असे डीजीएफटीने आपल्या अधिसूचनेत म्हटले आहे.

व्यापार बंदीमुळे पाकिस्तानच्या निर्यात क्षेत्राला दणका बसणार आहे. ज्यामध्ये सिमेंट, कापड आणि कृषी उत्पादनांसारख्या वस्तूंसाठी सीमापार व्यापारावर अवलंबून आहे. औपचारिक व्यापार आधीच मर्यादित असल्याने, या हालचालीमुळे अनौपचारिक व्यापार मार्ग देखील विस्कळीत होऊ शकतात आणि आर्थिक दबाव वाढू शकतो. २२ एप्रिल रोजी काश्मीरमध्ये पाकिस्तानमध्ये प्रशिक्षण घेतलेल्या दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात २६ पर्यटकांचा मृत्यू झाला होता. या प्राणघातक हल्ल्यामागील एक पाकिस्तानी दहशतवाद्यांपैकी एक, हाशिम मुसा, पाकिस्तानी लष्कराच्या विशेष दलाचा माजी पॅरा कमांडो असल्याचे तपासात समोर आलं आहे.

## राज्यात पुढील ४ दिवस वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाचा इशारा

**मुंबई (प्रतिनिधी)–** तापमानाचा पार वाढत चालला असल्यामुळे नागरिकांना उन्हाच्या झळांचा सामना करावा लागत आहे. दुपारच्या सुमारास घराबाहेर पडताना अंगाला उन्हाचे चटके बसत असल्यामुळे नागरिक हैराण झाले आहेत. अशातच राज्यातील काही भागांत ढगाळ वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे उन्हाच्या तडाख्यापासून काहीसा दिलासा मिळत आहे. अशा परिस्थितीत हवामान विभागाने राज्यातील काही भागांत अवकाळी पावसाचा इशारा अलर्ट जारी केला आहे.

संपूर्ण राज्यात पावसाची शक्यता असून मध्य महाराष्ट्र, कोकण, मराठवाडा, विदर्भातील बहुतांश ठिकाणी पावसाची आहे. नाशिक, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, जळगाव, धुळे, नंदुरबार, अमरावती, यवतमाळ, वर्धा, चंद्रपूर, नागपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोलीत येलो अलर्ट दिला आहे. तर मुंबई, ठाणे, रायगड, पुणे, सातारा, बीड, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड जिल्हांमध्ये जोरदार पावसाची शक्यता आहे.

## केरळमध्ये पाऊस १ जूनला तर महाराष्ट्रात ७-८ जूनला होणार दाखल

**मुंबई (प्रतिनिधी)–** मागील वर्षीप्रमाणे, यंदाही मान्सून शेतकऱ्यांना सुखावण्याची शक्यता आहे. मान्सूनवर एल निनो, ला निना किंवा हिंद महासागरातील द्विध्रुवीय घटकांचा परिणाम होणार नाही. त्यामुळे यंदाचा मान्सून नेहमीप्रमाणे सरासरी इतका आणि वेळेत दाखल होईल, अशी माहिती राष्ट्रीय समुद्र विज्ञान संस्थेचे माजी संशोधक आणि मान्सून अभ्यासक डॉ. एम. आर. रमेश कुमार यांनी दिली आहे.



ते म्हणाले, स्कायमेट आणि भारतीय हवामान खात्याकडून मान्सूनचा पूर्व अंदाज वर्तवण्यात आला आहे. यापुढील अनुमान १५ मे दरम्यान व्यक्त करण्यात येईल. यात मान्सूनची एकूण अचूकता स्पष्ट होईल.

यंदाचा मान्सून नेहमीप्रमाणे सरासरी इतका बरसेल आणि केरळमध्ये वेळेत दाखल होईल. १ ते ६ जून दरम्यान मान्सून गोव्यात दाखल होईल आणि ७ किंवा ८ जूनला तो महाराष्ट्रात सुरू होईल, असे डॉ. एम. आर. रमेश कुमार यांनी सांगितले.

## जिल्ह्यातील ५६ केंद्रावर २० हजार विद्यार्थी देणार नीटची परीक्षा

**नांदेड (प्रतिनिधी)–** नीट २०२५ ही परीक्षा आज दि. ४ मे २०२५ रोजी नांदेड जिल्ह्यामध्ये ५६ परीक्षा केंद्रांवर घेतल्या जाणार आहे. या परीक्षेसाठी ५६ केंद्र संचालक व ५६ निरीक्षक नेमण्यात आलेले आहेत, पर्यवेक्षणासाठी प्रत्येक कक्षामध्ये दोन पर्यवेक्षकांची नेमणूक करण्यात आलेली आहे, एका परीक्षा कक्षामध्ये २४ विद्यार्थी असतील. नांदेड शहराच्या जवळपास ४० किलोमीटरच्या परीक्षेतील शाळा या परीक्षा केंद्र म्हणून घेण्यात आलेल्या आहेत.

प्रश्नपत्रिका कस्टडीमधून घेतल्यापासून ते परीक्षा केंद्रावर निर्धारित वेळेत पेटीचे सील तोडेपर्यंत त्यावर जीपीएसने एनडीएमार्फत लक्ष ठेवण्यात येणार आहे. सर्व परीक्षा केंद्र वर सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आलेले आहेत. विद्यार्थ्यांना सकाळी ११ वाजेपासून रिपोर्टिंग करावयाचे आहे. जिल्हाधिकारी मार्फत सर्व परीक्षा केंद्रांच्या परिसरामध्ये जमावबंदी आदेश लागू करण्यात आलेले आहेत. सदरील परीक्षेसाठी एक डिस्ट्रिक्ट कोऑर्डिनेटर व चार सिटी कॉर्डिनेटरची एनटीएमार्फत नेमणूक करण्यात आलेली आहे.

## केंद्र जी कारवाई करेल त्याच्याशी सहमत –ओमर अब्दुल्ला

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** जम्मू काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी शनिवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतरची ही पहिली भेट आहे. दोन्ही नेत्यां मध्ये जवळपास अर्धातास बैठक सुरु होती. या बैठकीत पहलगाम दहशतवादी हल्ला आणि त्यानंतर निर्माण झालेली सुरक्षेसंदर्भातील स्थिती यासह विविध मुद्यांवर चर्चा झाली.



पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि ओमर अब्दुल्ला यांच्या बैठकीपूर्वी नॅशनल कॉन्फरन्सच्या सूत्रांनी बैठकीत काय होऊ शकतं याची माहिती दिली होती. केंद्र सरकार जो निर्णय घेईल त्यात जम्मू काश्मीरच्या प्रशासनाच्यावतीने संपूर्ण सरकार्य करण्याचं धोरण अब्दुल्ला यांचं आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा बदला आणि देशाच्या सुरक्षेच्या मुद्यावर केंद्र सरकारसोबत जम्मू काश्मीर सरकार राहणार आहे.

जम्मू काश्मीरमध्ये सुरक्षा विषयक आव्हान वाढत आहेत. केंद्र सरकारनं पाकिस्तान विरुद्ध कठोर कारवाईचे संकेत दिले आहेत. या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि ओमर अब्दुल्ला यांची भेट झाली आहे.

## मंदिराची भिंत कोसळून ७ भाविकांचा मृत्यू

**विशाखापट्टणम (प्रतिनिधी)–** आंध्र प्रदेशातील विशाखापट्टणममध्ये मंगळवारी रात्री श्री वराह लक्ष्मी नरसिंह स्वामी मंदिराच्या भिंतीचा २० फूट लांबीचा भाग कोसळला. या अपघातात ७ जणांचा मृत्यू झाला आणि ४ जण जखमी झाले.

मंदिरात चंदनोत्सव सुरू होता. दरवर्षी हा उत्सव साजरा केला जातो. येथे हजारो भाविक भगवान नरसिंहाच्या दर्शनासाठी येतात. अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार मुसळधार पावसामुळे ही दुर्घटना घडली. घटनेची चौकशी करण्याचे आदेश देण्यात प्रशासनाने दिले आहेत.

## कॅनॉलमध्ये वाहून गेलेल्या इसमाचा मृतदेह आढळला

**मुदखेड (प्रतिनिधी)–** शहरातील कॅनॉलमध्ये दि. २ मे रोजी एक इसम वाहून गेला होता. त्यांचा मृतदेह दि. ३ मे रोजी सकाळी ८ वाजता आढळला आहे.



मुदखेड शहरातील जितेंद्र रामचंद्र पानपट्टे (५३) हे दि. २ मे दुपारी दोन वाजता मेडका येथील बोगदा कॅनॉलमध्ये वाहून गेले होते. त्यांचा शोध सुरू होता. दुसऱ्या दिवशी दि. ३ मे रोजी सकाळी ८ वाजेच्या सुमारास शिंदी ता. उमरी शिवारातील कॅनॉलमध्ये एका पाईपला जितेंद्र पानपट्टे हे अडकून सापडले. शहरातील मित्र मंडळ घटनास्थळी धाव घेत त्यांचा मृतदेह कॅनॉलमधून बाहेर काढला. त्यानंतर उमरी ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदन करून प्रेत नातेवाईकांच्या स्वाधीन करण्यात आले. दुपारी ४ वाजेच्या दरम्यान त्यांच्या पार्थिवावर मुदखेड शहरातील हिंदू स्मशानभुमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, भाऊ बहीण असा परिवार आहे.

## पोलिसांच्या रोजगार मेळाव्यात ३५०५ बेरोजगार उमेदवारांना नियुक्तीपत्र

### पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार व त्यांच्या टीमला उत्स्फूर्त प्रतिसाद



**नांदेड (प्रतिनिधी)–** सुशिक्षित बेरोजगारांच्या हाताला काम देऊन वयाच्या शेवटच्या टप्प्यात असणाऱ्या काही उमेदवारांना गुन्हेगारीकडे न जाता नोकरीकडे वळवून आपल्या जीवनाचा स्तर उंचावण्यासाठी पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या संकल्पनेतून आयोजित केलेल्या रोजगार मेळाव्याला ९ हजार १५ पैकी ६ हजार ३८ उमेदवारांनी प्रत्यक्ष उपस्थिती लावली. या मेळाव्यासाठी ९७ कंपन्यांनी उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या. यात विशेष म्हणजे मूकबधिर दोन आणि दोन हात एक पाय नसलेला एक अशा दिव्यांग उमेदवारानाही जॉब देण्यात आला.

मुलाखतीसाठी आलेल्या सर्वांसाठी पोलीसविभागाच्यावतीने४४डिग्रीसेल्सिअस तापमान असतानाही थंड पाणी आणि भोजन देण्यात आले. जॉब मिळालेल्या सर्व उमेदवारांच्या चेहऱ्यावर हास्य फुलून दिसत होते.

या कार्यक्रमाला प्रमुख जिल्हा न्यायाधीश सुनील वेदपाठक, खासदार डॉ. अजित गोपछडे, खासदार रविंद्र चव्हाण, नामदार हेमंत पाटील, आमदार बालाजीराव कल्याणकर, आमदार आनंदराव बोंढारकर, नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, प्राचार्य डॉ. कोकरे, एकनाथ पवार, महापालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, डॉ. खंडेराव धरणे, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. अर्चना जगताप आदींची उपस्थिती होती.

युवकांचे रिकामे हात म्हणजे गुन्हेगारीला वाव, भविष्यात अशी गुन्हेगारी वाढू नये, हीच बाब हेरून ३ मे रोजी पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या पुढाकारातून भव्य रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यात दुपारपर्यंत नांदेड जिल्ह्यातील जवळपास ३ हजार ५०५ उमेदवारांना विविध कंपन्यांकडून नियुक्तीपत्र देण्यात आले. यामुळे बेरोजगार ते रोजगार ही थीम यशस्वी केल्यामुळे एसपी अबिनाश कुमार यांच्याबद्दल जिल्ह्यातून कौतुकाची थाप पडली आहे.

केंद्र व राज्य शासनाने मागील दोन वर्षांत सुशिक्षित तथा बेरोजगार युवा पिढीला रोजगार उपलब्ध करून देण्यावर भर दिला आहे. दरमहा विविध संस्था आणि कंपन्यांच्या सहकार्याने जिल्हा स्तरावर रोजगार मेळावे घेतले जात आहेत. शैक्षणिक संस्था, आयटीआय, जिल्हा प्रशासन, कौशल्य विकास व रोजगार मार्गदर्शन विभाग आदीच्या पुढाकाराने असे मेळावे होत आहेत. यातून आतापर्यंत हजारो युवकांना रोजगार मिळाले आहेत. यानंतर पहिल्यांदाच नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी आपल्या सर्व सहकाऱ्यांच्या बळावर रिकाम्या हातामुळे जिल्ह्यात गुन्हेगारी वाढू नये, युवकांचे आयुष्य बरबाद होऊ नये, ही बाब हेरून शनिवारी राज्यातील विविध कंपन्यांच्या सहकार्याने पोलीस मुख्यालयाच्या श्री गुरुगोविंद सिंघ मैदानावर भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन केले. या मेळाव्यास भरभरून प्रतिसाद मिळाला आहे. मिशन उडानअंतर्गत आयोजित मेळाव्याचे उद्घाटन लोकप्रतिनिधींच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सर्व लोकप्रतिनिधींनी आपले मनोगत व्यक्त केले. पोलीस दलाच्या या स्तुत्य उपक्रमाचे सर्वांनी कौतुक करून खऱ्या अर्थाने शासनाचे काम आपल्याकडून होत असल्याने नक्कीच शासन स्तरावर या कामाची दखल घेतल्या जाईल असे खा. अजित गोपछडे यांनी बोलून दाखवले.

यावेळी निवड झालेल्या काही उमेदवारांना मान्यवरांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले. या रोजगार मेळाव्यात जवळपास ११ हजार सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार उपलब्ध होईल, अशी अपेक्षा जिल्हा पोलिस अधीक्षक अबिनाशकुमार यांनी व्यक्त केली.

मेळावा यशस्वी करण्यासाठी पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या नेतृत्वाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी सुशीलकुमार नायक, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय, पोलीस निरीक्षक परमेश्वर कदम, ओमकांत चिंचोलकर, जयप्रकाश गुट्टे, रणजीत भोईटे, गणेश चव्हाण, रामदास शेंडगे, शिवाजी गुरमे, साहेबराव गुट्टे, नामदेव रिठे, बबन कराळे, भडीकर यांच्यासह जिल्ह्यातील पोलीस अधिकारी, सहाय्यक पोलीस निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक, कर्मचारी, महिला कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# शेजारधर्म



**कथा**

आज बागेत गर्दी कमी होती. नेने, पाठक, कुलकर्णी आणि रेगे हे चौघे एकाच ऑफिसमधून निवृत्त होऊन एकाच एरियात रहायला आले होते. सकाळ आणि संध्याकाळ बागेत फिरून प्राणायाम, व्यायाम आणि थोड्या गप्पा करून घरी परतत असत. यातील नेन्यांची आणि कुलकर्णींची मुले लग्नानंतर परदेशी स्थायिक झाल्याने मिस्टर आणि मिसेस एवढेच त्यांचे कुटुंब! चौघांच्या बायकाही कधी कधी संध्याकाळच्यावेळी बागेत यायच्या, पण वृद्धावस्था आणि गुडघेदुखीमुळे फिरणे कमीच व्हायचे. मग चौघी मिळून तब्येतीच्या कुरबुरी, जोडीदारांच्या कागाळ्या उगाळत बसत. पाठक आणि रेगे यांना मुलीच असल्याने त्या लग्न करून आपापल्या घरी सुखात राहत होत्या. नाही म्हणायला एखाद्या शनिवार रविवारी आई वडिलांना भेटायला चक्कर मारत पण त्यांच्याही नोकऱ्यां, मुलेबाळे यामुळे त्यांना क्वचितच वेळ मिळत असे. मुली रहायला आल्या की पाठक आणि रेगेबाई बागेत येत नसत. आपल्या मुलींना चारीचीज करून खायला घालावे असे त्या ठरवत. परंतु नेने आणि कुलकर्णी यांची मुले परदेशात असल्याने वर्षातून एकदाच महिन्याची सुट्टी घेऊन भारतात येत. पण महिन्याभरात घरात त्यांचा वेळ कमीच जाई. मित्रमंडळ, नातेवाईक, भटकंती आणि हॉटेलिंग यातच महिना कधी संपून जाई तेही कळत नसे. त्यामुळे मुले आली काय आणि गेली काय असे त्यांना काही फरक पडत नसे. नाही म्हणायला नातवंडांचा मात्र त्यांना चांगला सह-वास मिळत असे.

मुले आणि सुना आपल्या मुलांना वृद्ध आई-वडिलांकडे सोपवून फिरायला, शॉपिंगला जात. त्यामुळे आजी-आजोबांना नातवंडांशी खेळायला, गप्पा मारायला खूप आवडायचे. त्यांच्या सहवासात ते खुश असत. कारण त्यांना दटावणाऱ्या ममाडॅडापेक्षा लाड करणारे आजीआजोबा फार आवडत असत. चारी वृद्ध जोडप्यांचा वेळ एकमेकांच्या सहवासात चांगला जात असे. कोणी आजारी पडले की एकमेकाला मदत करायला ते नेहमी तत्पर असत.

एके दिवशी मात्र रेग्यांच्या छातीत अचानक दुखू लागले. यांच्या पत्नीला काय करावे तेच कळेना! मुलींना फोन करू की वृद्ध मित्रांना कळवू की पहिले डॉक्टरांना फोन करू? इकडे रेगे छातीवर हात दाबून विव्हळत होते. तेव्हा मिसेस रेग्यांनी आधी डॉक्टरांना फोन करत सांगितले, डॉक्टर ताबडतोब या! माझ्या मिस्टरांना छातीत वेदना होत आहेत. चौघांही जोडप्यांचे फॅमिली डॉक्टर एकच असल्याने त्यापैकी कोणीही बोलवले की डॉक्टर हातातील काम टाकून पळत येत असत. येताना इतरांनाही फोन करून कल्पना देत. रेगे वहिनींनी डॉक्टरांना फोन करून आपल्या मुलीला फोन लावला पण तिचा फोन नॉट रिचेबल दाखवत होता. त्या मनाने घाबरून गेल्या होत्या. इतक्यात पाठक, कुलकर्णी धावतच आले. कारण डॉक्टरांनी पोहोचेपर्यंत त्यांच्या छातीवर हाताने दाब देण्याचे सांगितले होते. रेग्यांची अवस्था पाहवली जात नव्हती. वेदनेने ते अक्षरशः तळमळत होते. कुलकर्णी पुढे आले आणि रेग्यांच्या छातीवर आपले दोन्ही हात एकावर एक ठेवून दाब देऊ लागले. पाच मिनिटात डॉक्टरही तिथे पोहचले. त्यांनी रेग्यांना वेदनाशामक इंजेक्शन दिले आणि म्हणाले, रेगे, तुम्हाला माईल्ड हार्ट अटॅक आला होता परंतु आता चिंता करण्याचे काही कारण नाही. तुम्ही आराम करा. मी लिहून दिलेली औषधे वेळेत खा एवढे सांगून डॉक्टर जायला निघाले. रेगे वहिनी डॉक्टरांचे पुन्हा पुन्हा आभार मानत होत्या.

थोड्या वेळाने रेग्यांना थोडाफार आराम पडला. रेगे वहिनींच्या जीवात जीव आला. त्यांनी मुलीला पुन्हा फोन लावला. आता मात्र मुलीने फोन उचलला रेगेवहिनी म्हणाल्या, अगं अनिता तू कुठे आहेस? तुला मी कधीपासून फोन करत होते परंतु तुझा फोन नॉट रिचेबल येत होता. आईचा फोन ऐकून रेग्यांची मुलगी ही काळजीत पडली. तिने विचारले, आई तुम्ही सर्व व्यवस्थित आहात ना? का फोन केला होतास? तसे रेगेवहिनी रडकुंडीला येत म्हणाल्या, अगं तुझ्या बाबांची तब्येत अचानक बिघडली पण तू काळजी करू नकोस. डॉक्टरांनी इंजेक्शन, औषध दिल्याने आराम पडला आहे. आपल्या कुलकर्णी आणि पाठक भाऊजींनी खूपच मदत केली. ऑफिस सुटल्यावर तू आरामात ये. सगळे काही ठीक आहे अनितालाही बाबांची तब्येत ठीक असल्याचे ऐकून बरे वाटले. तिने आईला ऑफिस सुटल्यावर येते असे सांगत फोन खाली ठेवला. रेग्यांना औषधामुळे झोप लागली. तसे कुलकर्णी आणि पाठक त्यांना म्हणाले, वहिनी तुम्ही काही खाल्ले आहे का? त्यांनी नाही असे सांगताच कुलकर्णींनी आपल्या पत्नीला फोन करून रेगे पतीपत्नीसाठी जेवण घेऊन यायला सांगितले.

चौघांचीही आर्थिक परिस्थिती चांगली असल्याने त्यांनी घरकामासाठी मोलकरणी ठेवल्या होत्या. पुढील पंधरा मिनिटात कुलकर्णीबाई गरम गरम जेवणाचा डबा घेऊन पोहोचल्या.

रेग्यांनाही जाग आली होती. सर्वांनी आग्रह करून रेगे पती-पत्नींना जेवण खायला लावले. दोघांच्या डोळ्यातून अश्रू पाझरत होते. आपल्या मित्रांची आज आपणास किती मदत झाली याचा विचार मनात येऊन रेग्यांनी आ-पले हात जोडले आणि म्हणाले, अरे दोस्तांनो, फार धन्यवाद !आज तुम्ही नसता तर माझी अवस्था फार बिकट झाली असती. तुमचे उपकार मी कधीच विसरणार नाही. तसे तिघेही दोस्त म्हणाले, अहो रेगे, धन्यवाद कसले करताय! आपण एकमेकांसाठी नाही करायचे तर कोणी करायचे? वेळ आणि प्रसंग सर्वांवर येऊ शकतो. पाठक म्हणाले, गेल्या वर्षी माझ्या पत्नीची तब्येत खराब झाली तेव्हा तुम्ही किती पळापळ केली होती आणि कुलकर्णींचा बाईक अपघात झाला तेव्हा आपणच त्यांना डॉक्टरांकडे नेले होते. एकमेकां साह्य करू, अवघे धरू सुपंथ असे म्हणून रेगे पती-पत्नींना आराम करायला सांगून सर्वजण आपापल्या घरी गेले.


रेगे पती-पत्नी आपल्या मित्रांच्या सहकार्याने भारावून गेले होते. आज रेग्यांना हृदयविकाराचा लहान झटका येऊन गेला होता पण प्रसंगावधान राखून पत्नीने डॉक्टरांना फोन केल्याने त्यांचे जीवावरचे संकट टळले होते. तसे मित्र आणि त्यांच्या बायकांनी त्यांना जेऊ घातले, सांत्वन केले. रेग्यांच्या डोळ्यांतून अश्रू पाझरत होते. ते आपल्या पत्नीचा हात हातात घेऊन म्हणाले, रेणू आज तुझ्यामुळे माझा जीव वाचला. तुझे मानावेत इतके उपकार कमीच! तसे रेगे बाई म्हणाल्या, अहो उपकार कसले? मी तर माझे कर्तव्यच केले. माझ्या कुंकवासाठी मी इतकेही नाही करायचे तर मनुष्य धर्माचा उपयोग काय? भारावलेल्या मनाने दोघे बसले असतानाच अनिता, त्यांची मुलगी धापा टाकतच घरी पोहोचली. आपल्या बाबांना सुखरूप पाहून ती आनंदाने आईच्या गळ्यात पडून रडू लागली. तिचे डोळे पुसत रेणुताई म्हणाल्या, अग वेडे! आता तुझे बाबा ठणठणीत आहेत मग रडतेस कशाला? डोळे पूस आणि काहीतरी खाऊन घे अनिताने येताना आईबाबांसाठी फळे, मिठाई, ड्रायफ्रूट्स आणले होते. ते आपल्या हाताने तिने बाबांना भरवले. आपल्या लेकीचे आपल्यावरील प्रेम पाहून वृद्ध दांपत्य सुखावले. मुलगी जन्माला आली तेव्हा वंशाला दिवा नाही म्हणून अनेक लोकांनी रेग्यांना टोमणे मारले होते पण आज तीच मुलगी वृद्ध आई-वडिलांची तब्येत बरी नसल्याचे कळताच धावत आली होती. आपल्या आई-बाबांची ती काठी झाली होती. रेणूताईंना आपल्या लेकीचा खूप अभिमान वाटला.आपल्या जीवनाचे सार्थक झाले असे वाटत त्यांनी पदराने आपले डोळे पुसले आणि तिला खाण्यासाठी काही बनवावे म्हणून उठून स्वयंपाकघरात गेल्या.

**-सौ. भारती सावंत**
खारघर, नवी मुंबई
मो. ९६५३४४५८३५

# सामाजिक मूल्य ऱ्हासाचं प्रतिबिंब मांडणारी कविता

**पुस्तक परीक्षण**

**व्यंकटेश सोळंके**
नांदेड
मो. ९९२२६५४७३२




प्रतीकं व प्रतिमांचा आलेख हा कवितेचा प्रांत असतो.त्यातील चिंतन व निरीक्षण बोधात्मक पद्धतीने संप्पन्नतेचा मंत्र सांगतात. नुसत्या शब्दांच्या उतुंगतेत कवितेचं नातं नसते. तर कवितेच्या संदेशात्मक अर्थाशी त्यांचं सख्य असते. जगण्यातल्या विविध प्रश्नांनांचे स्वरुप व त्यांतील विलक्षण पेचप्रसंग, प्रतिकं व प्रतिमेच्या माध्यमातून काळजाला भिडतात.या परिप्रेक्षात कविची कविता तंतोतंत बसते.

सद्य वस्तुस्थिती व परिस्थिती वर्तमानाच्या डोक्यावर बसलेली दिसते.व्यवस्थेचे साम्राज्य किती अबोध व दिशाहीन असते. वस्तुस्थितीला समजून घेत परिस्थिती बदलवण्यास व्यवस्था किती कुचकामी ठरते. या व्यवस्थेचं अंग असलेला प्रत्येक व्यक्ती निष्क्रियता व्यक्त करतो. यात माझ्यांने काय फरक पडणार? एकट्याने काय बदल होईल? या अशा प्रश्ना-तूनच कविता नैतिक पुरुषार्थांतील जगण्याचे अधःपतन अधोरेखित करते.मग नैतिक कुवतीस वर्तनाचे असे स्थिर संदर्भ कधीच नसतात असे कविला वाटत असावे असे प्रतित होते. म्हणूनच नामुष्कीचे वर्तन व्यवस्थेचे अंग बनून विनायक पवार यांच्या कवितेचा जन्म होतो. त्यांच्या कवितेने चित्रपट सृष्टीतीतून म राठी मणावर अधिराज्य गाजवले आहे.त्यांची कविता वाचकास शब्दावब्दात विचार करायला लावते.

कवितेच्या वास्तवाचा विचार वाचकास चक्रावतो. वर्तमानाच्या एकंदरीत आकलनाचा तटस्थ विचार कवितेत येतो. ती कविता आ-पली व काळजाची होते.वास्तवतेचं भान वाचकास आपसूकच कळते व तो अस्वस्थ होत जातो.

बुडत्याला पोहल्यांचे नाटक करता येत नाही. पोहणारा बुडण्याचे नाटक करु शकत नाही. चाड्यातल्या बिया फन्यातून मातीच्या पोटात गडप होतात.मातीचा कोथळा बाहेर पडतो.अशी मातीची चिरफाड प्रत्येक वर्षी करावीच लागते.एका लोककथेत मातीत सोनं पुरलेलं आहे; असं बाप मुलांना सांगून मरतो.पिढी दरपिढी ही परंपरा तशीच चालू असते.पंन्नास एकरचा दोन एकरात येतो.पण ह्या परंपरेचा वसा तो कधीच सोडत नाही. कारण पित्र नाराज होतील यासाठी बापास-ारखा परंपरागत मातीतच खपतो.एक दिवस पित्राची पत्रावळी पुजायला मोताज होतो. अन् तोच कंगाल झालेला शेतकरी शेवटी आत्महत्तेला मजबूर होतो.कर्जाच्या तगाद्यानं जरी गेला तरी सावकारीला गालबोट लागू नयेत अशीच तडजोड पडद्यामागे होते. शेवटी सर्वानुमते आत्महत्याच होती अशी राय होते. शेवटी तो कर्ज व नापिकीमुळे मेला अशी चिठ्ठी मिळते. शासनाकडून मिळालेल्या अन-ुदानात एखाद्या मुलीचं उरकून दिलं जाते. शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा प्रश्न गोडीगुलाबीने निकाली निघतो. ह्या हलाखीच्या परंपरेमुळे शेतकरी मनोधैर्य चांगलं घडण्यासाठी स्वताचं वाईट करुन घेण्यास नित्य सरसावतो.दुबळ्या आत्मबळाचा कलंक शेतकऱ्यांच्या माथ्यावरच कायमचा राहतो.शेती,कुटुंब व शेतकऱ्यांच्या वास्तवाचं आत्मभान कविता जागते.

'कर्जापायी गेला' म्हणून जबानी द्या
अन् फाईल लवकर टाका
एक लाखात रंजीचं लगन घ्या उरकून
लाथाडणाऱ्यांच्या छाताडावर बसता येत नाही.

ओरबडणारा सामाजिकता मेल्यानंतर ही एक एक अवयव घेऊन तृप्त होत नाही.हराळी न पेरताच उगवते पण अंब्याची कोय लावावी लागते.तुला माणुसकीचा मळा टिकवण्यासाठी शेतकरी होता आलं पाहिजे.सज्जनाचे मेंदू गहाण झालेत ते आता इंधनावर चालतात.तेव्हा तुम्ह-ाला सैनिक बनाव लागेल.यशाच्या वाटेवरुन जातांना कोणत्याही झाडाची फांदी तोडून पा-पाचं पातक माथी मारुण घेत तुझी पायरी उतरु नकोस. असा सल्ला एक बाप 'पत्र' या कवितेतून मुलास देतो. हीच वास्तवाची नाळ बाप मुलास जोडू पाहतो की काय असं वाटत राहते.

चटणीवर साहनुभूतीचे तेल टाकलं जातं. जखमेवर वृक्षारोपण करुन फोटोचा बाजार म ांडला जातो.पोरं पारावर पत्ते खेळत बसतात. शेती वाऱ्यावर सुटते. शेतकरी नापिकीचं खापर निसर्गावर फोडतो.पोरं शेतीस बेमोल विकून पसार होतात.थकलेला शेतकरी कंगाल व पागल होतो.नव्या पिढीकडे आशाळभूतपणे पाह-तो.अन्यथा पायखोरुन मरतो.त्याची नवी पिढी पायात रघ असेपर्यंत शेती विकून उत्सवात जगते.सर्व संपलं की पाय खोरुन मरते.

बाप पोरासाठी झुरत झुरत पोटासाठी झुरतो.पोरगं बापाचं जगणंच आळणी बनवतो.मग या व्यवस्थेचं एन्काऊंटर कसे होईल हा प्रश्न कविला पडतो.

वेड्याच्या पाठीवर
काठी मोडणाऱ्या
चौकीदारानं
दुसऱ्या दिवशी
तिथं एक ओळ
वाचली मातीवर
इथं माझं शेत
गाडलेले आहे!

समाजात 'मुलगी' म्हणून जन्माला येणं ओझं वाटते.

पण म्हशीनं कारवडीला जन्म दिला तर समाज खूश होतो. कारवडीच्या जन्मात किती आर्थिकता समाजाला दिसते. महिलांच्या बाबतीत अत्यंत संवेदनशील पद्धतीने कवी जबाबदार विधाने करतो. समाजाचा, संस्कृतीचा, परंपरांचा फोलपटपणा समोर ठेवून विचार करायला भाग पाडतो.

नवऱ्याचा मार खाऊन जाच फेकून देण्यासाठी माऊली विहरीवर पोहचते.तिला घरात अस-लेली लेक आठवते.मग ती गाईसारख हंबरुन घरी परत येते. पाण्यासारख पुन्हा संसारात सर्वच रंगात मिसळून जाते. माय लेक यांचं वात्सल्याचं नातं सांगणारी 'रंग' कविता खूप मनाला स्पर्शून जाते.सामाजिक बेरंग कसे पचवायचे ते स्त्रीला शिकवते.

मुलीला कळायला लागते तेव्हा पासून तिचा जन्म हा ओझ्याचा असं प्रत्येकानं पटवून दिलेलं असते. भोवल्यावर तरी आपलं ओझं संपेल असं वाटताच हुंड्यासाठी तिनं भोवल्यावरच रंडकी होतांना दिसते.'जन्म' ही कविता भारतीय स्त्रीत्व व स्त्री बाबतचे मागासलेपण मांडते.

हुंड्यासाठी
ती नव्याने रंडकी झाली
अक्षता म्हणून ती वाटत असते
कोरडेठाक उसासे
वर्तमानाच्या काळ्याशार तव्यावर भाजलेले.
पिकात उशिरा निसवलेलं ज्वारीचं धाट
अकालीची उगवन म्हणून आपण पाखरास सोडून देतो.म्हशीचं वगारु मेल्यावर मशीचा काळीज करपू नये म्हणून वगाराच्या कातडीत भुसा भरु ठवतो.माशा अंधळ्या होऊ नयेत म्हणून धूर न करता आपण मव्हळ हुलकावतो. पण गर्भार बाईला जाळून मारतांना आ-पली मुक्या जीवाबरोबर दाखवलेली माणुसकी व भुतदया कोठे लोप पावते?असा प्रश्न कवी 'विस्मरण' या कवितेतून मांडतो.

त्याचबरोबर पाखरांना बांधाच्या सीमांचे बंधन घातले जाते.मरणाच्या कस्तुरीचा गंध शिवारी नकोसा वाटतो. म्हणून हिरवळ एकदाची मरणाला चिटकून जावी म्हणून तारात करंट सोडले जाते.

वासरू गाईला लुचू नये म्हणून त्यांच्या तोंडाला काटेरी पट्टा बांधून त्याचा पान्हा चोरला जातो.वेळोवेळी मनुष्याच्या स्वार्थांने निसर्ग,मुके प्राणी व आपल्या जवळच्या माणसांना ही सोडले नसते.म्हणून लेखकांनी कवितेत बिघडलेल्या सद्य काळातील वर्तनाच्या पाऊलखुणा मांडलेल्या आहेत.

वेलीचे कंबरडे मोडून
बंधाट्या केल्या आम्ही
झाडाचे हात छाटून केले वासे
स्वत:चं घर शेकारणारे
फासे टाकत गेलो आम्ही..

शेतकऱ्यांकडे जमीन आहे.पण उत्पन्न नाही. उत्पन्न काढण्यासाठी आर्थिकता नाही.जर उत्पन्न निघाले तर हमी भाव नाही.त्याचे व्यवस्थापन म ुळीच जुळत नाही.जुळले तरी त्याच्या उत्पन्नांवर टपून बसलेली व्यापारी त्यांच्या पदरात काहींही पडणार नाही यांची तजबिज करून ठेवतात .

पण राजकारणात तसं नसते.त्यांचं उत्पन्न दर पाच वर्षांनी येते.ते मिळवण्यासाठी एका मोक्याच्या व मोकळ्या रहदारीच्या ठिकाणी दर्गा, मंदिर किंवा विहार बांधले जाते. पुढचं पिक आता आपल्या हातास लागणार नाही हे कळताच त्यावरुन तनाव निर्माण करुन नक्किच निवडून येता येईल अशी उपाययोजना असते.तसेही नसेल तर उत्सव, मिरवणूक काढून उदो उदो करवून घ्यावयाचा असतो.मर्यादेपेक्षा जास्त पाजायची पुढचं पिक पदरात पाडायचे असा पद्धतशीरपणे व्यवस्था केलेली असते.म लपृष्ठावरील वास्तवाचे बखान कविता सद्य राजकारण व समाजकारणाचं बीबत्स रुप प्रगट करते.

अरे सर्च करा
शोध लावा
शोधा
परग्रहावर माणसं आहेत का?
पुढच्या दंगलीत मारता येतील

आजोबा नावाची कविता तर आपल्याला गदगद करुन सोडते.अजोबाची काळजी करणारा नातू आजोबांना भेटण्याचे हट्ट करत असतो.नातू आजोबास भेटतो तेव्हा त्यांच्या नजरेस आभाळ दिसते.नातवास आजोबांच्या पाठीवर खेळून म ोक्ष मिळते.लेखक 'आजोबा' कवितेतून नातू व आजोबांच्या हळव्या नात्याचे अंतरंग कवितेत मांडतात.

'झोपडी' कवितेतून कवी तेहत्तीस के.व्ही. उपकेंद्रा शेजारी असलेल्या गरीबांच्या घरातला अंधार सांगते. त्या तशाही अंधारात पोटुशीच्या नजरेतून सुर्याचे बीज झोपडी रुजवू पाहते असे कवी मांडतो. शेतीची मालीश नित्यांने करणारा व पाखरांकडे दुर्लक्ष फक्त शेतकरीच करतो. उपाशीपोटीसुद्धा शेतकऱ्यांचे उद्दात्त जगणे हे त्यांची माणुसकी सांगते.

वर्तन व वर्तमानाचे भान व भाव अलगद नेमकेपणाने व नेमक्या शब्दात टिपण्याची कसब कवीमध्ये आहे.कविचे जागृत आत्मभान वाचकांशी प्रामाणिक संवाद साधते .कवितेतून मांडलेल्या जगण्यातल्या अडचणी व भेदकता वाचकास आत्मप्रवृत्त करायला भाग पाडते.

धर्म ,राजकारण व समाजकारण या विषयाशी संबंधित वास्तव टोकाचं भाष्य वा-चताना कवितेतून अस्वस्थ करुन सोडते.समृद्ध अनुभव व कल्पक दृष्टीने कवितेत आलेले प्रसंग माणसांना अनैक घटनेशी जोडतात. वाचक प्रसंगी कवितेत नायक होतो. कधीकधी त्यास त्याच्या निष्क्रियतेबद्दल मस्ताप करुन घेतो. कवितासंग्रहातील एकूण अठ्ठयाहत्तर कविता आहेत. प्रत्येक कविता वेगळ्या धाटणीची व वेगळेपणा दर्शवणारी निश्चितच आहे.अनपेक्षित व चमतकृतीक धक्कातंत्र अनैक कवितेच्या शेवटात जाणवते. त्यामुळे या कविता वाचतच रहाव्यात असे वाटते.

घटनेचं गांभीर्य लक्षात न येणारा समाज व त्यांच्या वर्तनाने घडणारे नेमके बदल कवितेच्या पानापानातून प्रत्ययास येतात.तेच वर्तन आपल्या नामुष्कीला कारणीभूत ठरते.मग पिढीजात नामुष्की हेच वर्तमान जीवन बनते.

**काव्यसंग्रह : नामुष्कीचे पिढीजात वर्तमान**
**कवी:-विनायक पवार (९७६७४६०१३४)**
**प्रकाशक:-अथर्व पब्लिकेशन्स**
**मूल्य - १५०/-**
**पृष्ठे:-९४**

## करू नको अहंकार...

जगी नाम होण्यासाठी
आधी तपावे लागते ।
अरे चंदनासमान
नित्य झिजावे लागते ।।
आयत्याला कुठे इथे
गोड लागते भाकरी ।
त्यांना भोगावे लागते
फक्त दुःख नानापरी ।।
हिनवून दुबळ्यांना
तुझी लायकी दावतो ।
अरे कशाला माणसा
पशु समान जगतो? ।।
तुज मरण येईल
तेंव्हा मातीच होशील ।
देह मातीचा पुतळा
किती काळ टिकशील? ।।
प्रेमरूपी मद्यप्याला
जरा तुझ्या ओठी लाव ।
मदतीला गरिबांच्या
मनोभावे नित्य धाव ।।
जग सद्भावे माणसा
करू नको अहंकार ।
जन्म देणाऱ्यांचे कधी
भुलू नको उपकार ।।

**-अजय रमेश चव्हाण,**
तरनोळी ता.दारव्हा, जि.यवतमाळ
मो.८८०५८३६२०७

## मी शांत आहे

हात सोडू नकोस उगीच माझा,
मी शांतता आहे, माझी गरज
नसल्याचा आव आणू नकोस,
इतिहासाची पाने चाळून पहा,
समजेल तुला माझे महत्व.
अनेकांनी अनेक लढाया, मला
शस्त्र बनवून जिंकल्या,
अनेक शत्रुंनी हिंसा सोडली
माझ्यामुळे, शांतता आहे मी,
माझा स्वीकार कर, आधुनिक
माणूस म्हणून उगाच मिरवू
नकोस, चार चौघात,
हात सोडू नकोस उगीच माझा.
मी गांधी, मी बुद्ध
मीच यशू आहे, हे
ध्यानात धर, बाहेरच्या अर्थहीन
कोलाहलात,नकोस
अडकवू स्वतःला, तुझ्या
हृदयात माझे पालन कर,
मी शांतता आहे....तुला
अमूर्त विजयाकडे नेणारी,
हात सोडू नकोस उगीच माझा.

**-अमित शिंदे**
नांदेड
मो. ९७६७८५१०४६.

# भावसंगीताचा शुक्रतारा : अरुण दाते!




दोन पिढ्या आपल्या तरल आणि हळूवार गीतांनी रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजविणारे अरुण दाते म्हणजे भावगीतातील शुक्रताराच होते. त्यांनी लिहिलेले 'शतदा प्रेम करावे' हे आत्मचरित्र प्रसिद्ध आहे. शुक्रतारा मंदवारा, या जन्मावर या जगण्यावर, दिवस तुझे फुलायचे, भातुकलीच्या खेळामधले राजा आणि राणी, भेट तुझी माझी स्मरते, स्वरगंगेच्या काठावरती वचन दिले तू मला, शपथ तुला आहे, यासारखी असंख्य गाणी अरुण दाते यांनी अजरामर केली. ४ मे हा सुप्रसिद्ध भाव-गीत गायक अरुण दाते यांचा जन्मदिन. त्यानिमित्ताने ...

आपल्या मखमली आणि सुरेल आवाजाने भावगीतांना वेगळाच आयाम देऊन त्यांना नव्या उंचीवर नेऊन ठेवणारे ज्येष्ठ भावगीतगायक अरुण दाते यांचा जन्म ४ मे १९३४ रोजी इंदूर मध्ये झाला. वडील रामूभैय्या दाते इंदूरचे प्रतिष्ठीत गायक असल्याने बालपणीच त्यांना घरा-तून संगीताचे बाळकडू मिळाले.वडिलांच्या इच्छेनुसार गायक झालेल्या अरुण दाते यांनी सुरुवातीला इंदूरजवळच्या धार येथे कुमार गंधर्व यांच्याकडे तर पुढील शिक्षण के. महावीर यांच्याकडे घेतले. दरम्यान, मुंबई येथे कापड अभियांत्रिकीचा अभ्यास करत असताना पहिल्या वर्षीच्या परीक्षेत अरुण दाते नापास झाले. तथापि, वडिलांनी त्यांना 'टेक्सटाईल इंजिनीयर तर अनेक जण होतील, पण तुझ्यासारखे गाणे किती जणांना गाता येते' असे विचारून गाणे शिकण्यास प्रोत्साहन दिले. घरातून असे प्रोत्साहन मिळाल्यावर दाते यशस्वी गायक झाले नसते तरच नवल.

थोडासा पातळ आणि तलत मेह्मुदूच्या जातकुळीतील आवाज असणाऱ्या दाते यांनी १९५५ पा-सून आकाशवाणीवर गाण्यास सुरुवात केली. १९६२ मध्ये त्यांनी सुप्रसिद्ध कवि मंगेश पाडगावकरांनी लिहिलेले आणि ख्यातनाम संगीत दिग्दर्शक श्रीनिवास खळे यांनी चालबद्ध केलेले 'शुक्रतारा मंद वारा' हे पहिले मराठी गीत गायले आणि त्या गाण्याने इतिहास घडवला. त्या महिन्यात ते गाणे महाराष्ट्रभर पोचले व गाजले आणि दाते पहिल्या गाण्यालाच रेडीओ स्टार झाले. त्याकाळी ग. दि .मा., राजा परांजपे, सुधीर फडके ही त्रयी चित्रपट व संगीत यांमध्ये महाराष्ट्रात प्रसिद्ध होती. त्यानंतर पाडगावकर, खळे, दाते ही नवी त्रयी भावगीत संगीतात जन्मास आली.

वयाच्या पन्नाशीत म्हणजेच १९८४ पासून त्यांनी आपले लक्ष भावगीतांवर केंद्रित केले. २०१० पर्यंत अरुण दाते यांचे 'शुक्रतारा' या नाव-ाने होणाऱ्या मराठी भावगीत गायनाचे २५०० हून अधिक कार्यक्रम झाले. त्यांचे उर्दूतील आणि मराठीतील गीतां चे पंधराहून अधिक अल्बमही लोकप्रिय आहेत. मंगेश पाडगावकर, यशवंत देव, आणि अरुण दाते या अनुक्रमे कवी, संगीत दिग्दर्शक आणि गायक या त्रिकुटाने मराठी भावगीताला अफाट लोकप्रियता प्राप्त करून दिली असे म्हणणे गैर ठरणार नाही. दाते यांनी लता मंगेशकर, आशा भोसले, अनुराधा पौडवाल, सुमन कल्याणपूर, सुधा मल्होत्रा, कविता कृष्णमुर्ती, पुष्पा पागधरे यांबरोबर द्वंद्वगीते गायली आहेत. त्यांचे दिनांक ६ मे २०१८ रोजी मुंबईतील कांजूरमार्ग येथील निवासस्थानी निधन झाले. भावसंगीताच्या शुक्रताऱ्यास विनम्र अभिवादन !

**-प्रा. विजय कोष्टी**
कवठेमहांकाळ जि.सांगली

## थोडक्यात...

### नीट प्रवेश परीक्षा काळात प्रतिबंधीत

**नांदेड (प्रतिनिधी)–** राष्ट्रीय परीक्षा एजन्सी नवी दिल्लीमार्फत आयोजीत नीट (युजी) प्रवेश परीक्षा नांदेड जिल्ह्यात आयोजीत करण्यात आली आहे. या परीक्षेसाठी जिल्ह्यात एकूण ५६ केंद्र नियोजीत असून त्यापैकी नांदेड शहरात ४६ केंद्र, मुदखेड तालुक्यात ४ केंद्र, नायगाव तालुक्यात ४ केंद्र व बिलोली तालुक्यात २ केंद्रावर ही परीक्षा रविवार, दि. ४ मे २०२५ रोजी नियोजीत आहे. नीट (युजी) प्रवेश परीक्षाकरीता पात्र उमेदवारांनी रविवार, दि.४ मे २०२५ रोजी सकाळी ११ वाजेपर्यत पोहचण्याचे प्रयोजन करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले नांदेड यांनी केले आहे.

### पशुसंवर्धन विभागाच्या योजनांसाठी ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)–** पशुसंवर्धन विभागाच्या वैयक्तीक लाभाच्या योजनांचा लाभ घेण्यासाठी ऑनलाईन अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. यासाठी https://ah.mahabms.com हे संकेतस्थळ, मोबाईल ॲप AH-MAHABMS व टोल फ्री क्रमांक १९६२ देण्यात आला आहे. पशुपालक शेतकरी, सुशिक्षित बेरोजगार युवक, युवती व महिलांनी या योजनांचा लाभ घेण्यासाठी २ जून २०२५ पर्यत ऑनलाईन पध्दतीने अर्ज दाखल करावे, असे आवाहन पशुसंवर्धन विभागाने केले आहे.

पशुपालकांना डेअरी, पोल्ट्री किंवा शेळीपालन यापैकी ज्या बाबींमध्ये अर्ज करावयाचा आहे, त्याची निवड करण्याची सुविधा देखील उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

# शेतकऱ्यांना बियाणे, खते, कीटकनाशके यांची कमतरता भासू देऊ नका -पालकमंत्री सावे

## खरीप हंगाम पुर्वतयारी आढावा बैठक संपन्न



**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड जिल्ह्याला खरीप हंगाम २०२५ साठी एकूण ७ लाख ७६ हजार ७६२ हेक्टर क्षेत्र प्रस्तावित आहे. या खरीप हंगामात शेतकऱ्यांना पेरणी करण्यासाठी बि-बियाणे, खते, किटकनाशके यांचा पुरवठा करण्यास कमतरता भासू देऊ नका, अशी सूचना राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपारिक ऊर्जा मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांनी केली. खरीप हंगाम २०२५ पुर्व तयारी आढावा बैठक जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन भवनात पालकमंत्री अतुल सावे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी ते बोलत होते.

या बैठकीस माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण, खासदार रविंद्र चव्हाण, खासदार डॉ. अजित गोपछडे, आमदार राजेश पवार, आमदार भीमराव केराम, आमदार जितेश अंतापूरकर, आमदार श्रीजया चव्हाण, आमदार आनंदराव तिडके, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, अपर जिल्हाधिकारी पी. एस. बोरगावकर, निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत तसेच विविध संबंधित विभागाचे अधिकारी आदीची उपस्थिती होती.

खरीप हंगामात शेतकऱ्यांना बि-बियाणे पुरवठा व्यवस्था योग्य रितीने करावा, त्यांना बियाणे व किटकनाशकांची उपलब्धता वेळेत होईल, याचे नियोजन कृषी विभागाने करावे. जिल्ह्यातील बोगस बि-बियाणे पुरवठा करणाऱ्यांवर कडक कारवाई करा, असे निर्देश पालकमंत्री अतुल सावे यांनी दिले. तसेच शेतकऱ्यांना विविध योजनांची जास्तीत जास्त माहिती होण्यासाठी कृषी विभागाने व्हॉटसअॅप ग्रुप तयार करुन त्याद्वारे त्यांनी आवश्यक माहिती पोहोचवावी. कृषी क्षेत्रात एआयचा वापर करुन शेतकऱ्यांच्या उत्पादन वाढीसाठी प्रयत्न करावे असेही निर्देश त्यांनी दिले. ज्या बँका शेतकऱ्यांना पिक कर्ज देण्यास टाळाटाळ करतात त्यांना शासनाकडून देण्यात येणारी सवलत कमी करण्याबाबतही त्यांनी सांगितले.

जिल्ह्यात पिकविमा अनेक तालुक्यामध्ये खूप कमी अधिक प्रमणात वितरीत होत आहे. याबाबत तालुका स्तरावर नियोजन असावे. शेतकऱ्यांच्या समस्या, अडचणी सोडविण्यासाठी तालुका पातळीवर व्यवस्था करावी, अशी मागणी खासदार अशोक चव्हाण यांनी केली. तसेच विमा कंपनीने आतापर्यत किती रक्कम वितरीत केली, अजून किती रक्कम येणे शिल्लक आहे याची वर्षनिहाय माहिती द्यावी. उत्पादन वाढीसाठी एआयचा वापर, जिल्ह्यात जलसंधारण व जलसंपदाच्या मंजूर प्रकल्पांना निधी उपलब्ध व्हावा, जिल्ह्यात मक्याचे क्षेत्र वाढावे यासाठी उपाययोजना आखाव्यात अशा सूचना खासदार अशोक चव्हाण यांनी केल्या. यासोबत त्यांनी अर्धापूर व मुदखेडला केळी निर्यात सुविधा केंद्र व धर्माबादला मिर्ची संशोधन केंद्र सुरू करण्याबाबतचा प्रस्ताव मांडला.

नांदेडला सोयाबीन प्रक्रिया उद्योग सुरु करावे, तसेच शेतकऱ्यांच्या समृध्दीसाठी नांदेड जिल्ह्यात आयसीएआरचे केंद्र उभारण्यासाठी प्रयत्न करावेत अशी मागणी खासदार डॉ. अजित गोपछडे यांनी केली.

प्रास्ताविकात जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत यांनी पीपीटीद्वारे जिल्ह्यातील खरीप हंगामासाठी केलेल्या पुर्वतयारीच्या नियोजनाची माहिती दिली. सुरवातीला मान्यवरांच्या हस्ते कृषि मार्गदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी राज्यस्तर प्रथम क्रमांक विजेते माधव शंकरराव पाटील रा. चैनपूर ता. देगलूर व सुनिल नामदेव चिमनपाडे रा. कुडली ता. देगलूर यांना द्वितीय क्रमांक मिळाल्याबाबत त्यांचा सन्मान करण्यात आला.

जिल्ह्यातील आतापर्यत अवयवदान केलेल्या दात्यांच्या कुटुंबियांचा सन्मान पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते करण्यात आला. यामध्ये चंद्रकला रावळकर, भाग्यश्री संतोष मोरे, सोनाली भुजंग मस्के, नामदेव दादाराव पवळे, लक्ष्मीबाई पवळे, शोभा सुर्यकांत साधु व डॉ. दीपक साधू, प्रिया अभिजीत ढोके यांचा सन्मान करण्यात आला. अवयवदानाची शपथ पालकमंत्र्याच्या हस्ते उपस्थितांना देण्यात आली.

जिल्ह्यातील ७ विद्यार्थी युपीएससी परिक्षेत उत्तीर्ण झाले असून या विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा सत्कार पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते करण्यात आला. यामध्ये कृष्णा जाधव पाटील, सुनिल राम लिंग स्वामी, आयुष कोकाटे, वेदांत माधव पाटील उंचेकर, अतुल अनिल राजूकर, शिवराज गंगावळ, आनंद सदावर्ते यांचा व त्यांच्या पालकांचा पुष्पगुच्छ देवून सन्मान करण्यात आला.

## पुण्यात परशुराम आर्थिक विकास महामंडळ कार्यालयाचे उद्घाटन



**नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून परशुराम आर्थिक विकास महामंडळ कार्यालयाचे, पुणे येथे राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी खासदार मेधाताई कुलकर्णी, महंत सुधीरदास, मंडळाचे अध्यक्ष कॅप्टन आशिष दामले यांची उपस्थिती होती.

हे आर्थिक विकास महामंडळ करण्यात अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाचे मोठे योगदान आहे. या आर्थिक विकास महामंडळाचे स्थापना केल्याबद्दल अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाचे संपूर्ण महाराष्ट्रातील पदाधिकारी, प्रदेशाध्यक्ष निखील लातूरकर, पुणे जिल्हाध्यक्ष मंदार रेडे, सोनल भोसेकर, विलास कौसडीकर, दिलीप कुलकर्णी, सचिन कुलकर्णी, शशांक खेर, शैलेश महाजनी यांनी भगवान परशुराम यांची मुर्ती भेट देऊन स्वागत केले.

## पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्याकडून नरसी पोलीस चौकीच्या इमारतीची पाहणी

**नायगाव बाजार (प्रतिनिधी)–** नरसी येथील पोलीस चौकीच्या आवारात लोकसहभागातून बांधण्यात येत असलेल्या नूतन इमारतीची पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार शुक्रवारी पाहणी केली.

नांदेड जिल्ह्यातील प्रमुख चौरस्त्याचे मध्यवर्ती ठिकाण असलेल्या नरसी तालुका नायगाव येथील फाट्यावर रामतीर्थ पोलीस ठाण्याची पोलीस चौकी कार्यरत आहे. या इमारतीचे देखील काही वर्षांपूर्वी सपोनि अशोक जाधव यांनी देखील लोक सहभागातूनच बांधकाम केले होते. दरम्यान प्रशासकीय व विविध बंदोबस्त कामी येणारे वरिष्ठ अधिकारी तसेच इतर कार्यालयीन कामकाजासाठी येथे अजून एका सुसज्ज इमारतीची फार गरज होती. तीच गरज ओळखून चौकीच्या आवारात उपलब्ध असलेल्या मोकळ्या जागेत सपोनि श्रीधर जगताप यांनी लोक सहभागातून नूतन इमारत निर्मितीसाठी पुढाकार घेतला आहे.

सध्या या नूतन इमारतीचे बांधकाम अंतिम टप्प्यात आले असून शुक्रवारी हैदराबादहून नांदेडकडे जात असताना पोलीस अधीक्षक अबीनाश कुमार यांनी अचानकपणे नरसी पोलीस चौकीस भेट दिली व या नूतन उपक्रमाची पाहणी केली. या लोकोपयोगी कार्याबद्दल सपोनि श्रीधर जगताप यांच्या पुढाकाराचे त्यांनी विशेष कौतुकही केले.



यावेळी नायगांव येथील परिवक्षाधीन पोलीस उपाधीक्षक किरण पोपळघाट, पोलीस निरिक्षक सुभाषचंद्र मार्कड, सपोनि श्रीधर जगताप, पोलीस उपनिरीक्षक शिवराज नरवाडे यांची उपस्थिती होती. येत्या काही दिवसांत विशेष पोलीस उपमहानिरीक्षक नांदेड यांच्या हस्ते या नूतन इमारतीचे लोकार्पण करण्यात येणार असून यावेळी पोलीस अधीक्षक अविनाश कुमार उपस्थित राहणार असल्याचे सपोनि श्रीधर जगताप यांनी सांगितले आहे.

## जातनिहाय जनगणनेच्या निर्णयाचे मुदखेड भाजपकडून जल्लोषात स्वागत




**मुदखेड (प्रतिनिधी)–** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी घेतलेल्या जातनिहाय जनगणना ऐतिहासिक निर्णयाचे भाजपच्यावतीने स्वागत करण्यात आले आहे. यावेळी पदाधिकाऱ्यांनी जल्लोष साजरा केला आहे.

गेल्या ९५ वर्षांपासून उपेक्षित असलेल्या समाजाला जातनिहाय जनगणने पासून वंचित ठेवण्यात आले आहे. भाजपप्रणित केंद्र सरकारने जातीनिहाय जनगणना करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. या निर्णयाचा भाजप शहराध्यक्ष रामसिंग चव्हाण, तालुकाध्यक्ष दत्तू पाटील वाडीकर, महामंत्री प्रवीण गायकवाड मिठाई वाटप करून जल्लोष करण्यात आला. यावेळी संजय सोनटक्के, माधव कदम, भगवान पानेवाड, संजय आवलवार, गोविंद गोपनपल्ले, प्रभाकर पांचाळ, संजय चव्हाण, संतोष गाढे, ईश्वर पिनलवार, मनोज कमटे, नितीन चौदंते, विनोद चंद्र, कुणाल चौदंते, सुधाकर सूर्यवंशी, राजू बारतोंडे, अरुण चौदंते, शिवा तोटेवाड यांच्यासह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

## भोकर येथील मतिमंद अल्पवयीन मुलीवर बलात्कार करणाऱ्यास २० वर्ष शिक्षा

**नांदेड (प्रतिनिधी)–** भोकर शहरात शेजारी राहणाऱ्या एका नराधमाने मतिमंद असलेल्या अल्पवयीन मुलीवर बलात्कार केला होता. या प्रकरणात तांत्रिक व सूक्ष्म पद्धतीने पोलीस उपनिरीक्षक राणी भोंडवे (बर्डे) यांनी तपास करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले होते. यावरून भोकर येथील अतिरिक्त जिल्हा सत्र न्यायाधीश वाय. एम. एच. खरादी यांनी नराधम आरोपीस वीस वर्ष आणि रोख पंधरा हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली.

भोकर शहरातील अशोक कॉलनी भागात राहणारा नितीन नागनाथ मुपीडवार (वय ३३) या नराधमाने शेजारी राहणाऱ्या एका अल्पवयीन मतिमंद मुलीवर बलात्कार केला होता. या प्रकरणी भोकर पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर नंबर १५१/२२ कलम ३७६ अब, ३७६ (२), ३७६ (३) भादवी सहकलम ४, ६, ८, १२ पोक्सोंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक राणी भोंडवे यांनी करून आरोपीस अटक केली होती. पीडित मुलीची वैद्यकीय तपासणी, साक्षीदारांचे बयान, सूक्ष्म तपास करून न्यायालयात दोषारोपत्र दाखल केले. न्यायालयाने या प्रकरणात नऊ साक्षीदार तपासले. सरकारी अभियोक्ता अनुराधा रेड्डी यांनी या प्रकरणात क्रुरता लक्षात घेता आरोपीस जास्तीत जास्त शिक्षा व्हावी असा युक्तिवाद केला. पीडित मुलीचे बयान, साक्षीदारांचे बयान आणि वैद्यकीय अहवाल तसेच पोलिसांनी केलेला योग्य तपास या सर्व बाबी लक्षात घेऊन न्यायाधीश खरादी यांनी नितीन मुपीडवार यास वीस वर्ष सक्त मजुरी आणि रोख पंधरा हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. यातील दहा हजार रुपये पीडित मुलीला देण्याचा आदेशही दिला आहे. या प्रकरणात पैरवी अधिकारी म्हणून फिरोजखान पठाण यांनी काम केले. प्रकरणाचा योग्य तपास करून आरोपीस वीस वर्षाच्या शिक्षेपर्यंत पोहोचविल्याबद्दल पोलीस उपनिरीक्षक राणी भोंडवे यांचे पीडित मुलींच्या नातेवाईकांनी कौतुक केले.

## पाटोदा येथे ग्रंथतुला कार्यक्रमांतर्गत मोफत नेत्र तपासणी शिबीर

**नांदेड (प्रतिनिधी)–** राज्याचे माजी शिक्षणमंत्री कमलकिशोर कदम यांनी शिक्षण, प्रशासकीय व सामाजिक क्षेत्रात दिलेल्या बहुमूल्य योगदानामुळे नायगाव तालुक्यातील पाटोदा येथे गजानन शिंदे यांच्या परिवाराकडून ग्रंथतुला कार्यक्रम दि. ४ मे रोजी सकाळी १० वाजता हनुमान मंदिर येथे आयोजित करण्यात आला आहे. तसेच याठिकाणी मोफत नेत्र तपासणी शिबिराचेही आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती देण्यात आली.



या ग्रंथतुला सोहळ्यास उद्घाटक म्हणून ग्रामस्वच्छता अभियानाचे माजी अध्यक्ष माधवराव पाटील शेळगावकर तर अध्यक्ष म्हणून खा. प्रा. रविंद्र चव्हाण, विशेष अतिथी आ. प्रताप पाटील चिखलीकर, ग्रंथतुला सत्कारमुर्ती म्हणून माजी शिक्षणमंत्री कमलकिशोर कदम यांची उपस्थिती असणार आहे. माजी मंत्री जयप्रकाश दांडेगावकर, माजी मंत्री राजेश टोपे, आ. विक्रम काळे, आ. सतिश चव्हाण, कुंटूर कारखान्याचे चेअरमन राजेश कुंटूरकर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजितदादा गट) जिल्हाध्यक्ष दिलीपराव धर्माधिकारी, कृउबा समितीचे माजी सभापती बाळासाहेब धर्माधिकारी बरबडेकर, प्रियदर्शनी महाविद्यालयाचे अध्यक्ष बालासाहेब मादसवाड, लोकपत्रचे आवृत्ती संपादक डॉ. गणेश जोशी, राष्ट्रवादी काँग्रेस शहर जिल्हाध्यक्ष डॉ. सुनील कदम, डॉ. विक्रम देशमुख तळेगावकर, मुदखेडचे माजी नगराध्यक्ष राम चौधरी, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष भगवानराव पाटील आलेगावकर, राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा गट शहर जिल्हाध्यक्ष जीवन घोगरे पाटील, राष्ट्रवादीचे प्रदेश सरचिटणीस वसंत सुगावे, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष रऊफ जमिनदार, शासकीय गुत्तेदार रोहन मांडे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. या सोहळ्यास परिसरातील नागरिकांनी उपस्थित रहावे असे आवाहन गजानन शिंदे केले आहे.

## महात्मा बसवेश्वर यांचे कार्य सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवा -शिवा जिल्हाध्यक्ष कापसे



**अर्धापूर (प्रतिनिधी)–** जगत्ज्योती महात्मा बसवेश्वर यांनी केलेले कार्य सर्वांपर्यंत पोहचविण्यासाठी तरुणांनी पुढाकार घ्यावा असे आवाहन महात्मा बसवेश्वर जयंती कार्यक्रमात बोलताना शिवा संघटनेचे नांदेड उत्तर जिल्हाध्यक्ष विलास कापसे यांनी केले आहे.

जगत्ज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या जयंतीनिमित्त बसवेश्वर चौकातील प्रतिमेचे पुजन नगराध्यक्ष प्रतिनिधी प्रवीण देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस उपनिरीक्षक सुरेश भोसले, पोउनि एन.के.जाधव, शिवा संघटनेचे नांदेड उत्तर जिल्हाध्यक्ष विलास कापसे, माजी उपनगराध्यक्ष राजेश्वर शेटे, शिवा कर्मचारी संघटनेचे जिल्हा कार्याध्यक्ष ग्रामसेवक शिवकुमार देशमुख, गटनेते बाबुराव लंगडे, व्यंकटी राऊत, डॉ.विशाल लंगडे, उमाकांत सरोदे, शेतकरी सेना तालुका प्रमुख रमेश क्षीरसागर, अशोकराव डांगे, शिवा संघटनेचे तालुकाध्यक्ष ओमप्रकाश नागलने, माजी सभापती प्रतिनिधी गोविंद गोदरे, पिराजी साखरे, माजी नगरसेवक प्रकाश सरोदे, प्रा.नंदकुमार कल्याणकर, नागेश खरसकर, माधवराव सोनटक्के, साईनाथ लंगडे, कैलास भुस्से, गोविंद लंगडे, शंकर गोमाशे, गोविंद लंगडे, कृष्णा लंगडे, कुमार पत्रे, मन्मथ शेटे, अक्षय शेटे, हनुमंत वाघमारे आदींसह अनेकजन उपस्थितीत होते. शिवा संघटनेच्यावतीने जयंतीनिमित्त पाणी वाटप करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संपर्कप्रमुख साईनाथ लंगडे यांच्यासह अनेकांनी परिश्रम घेतले.

# नांदेड जिल्ह्यात केळी, मिरची आणि सोयाबीन संशोधन केंद्राला तत्काळ मंजुरी द्या

## खा. रविंद्र चव्हाण यांचा पालकमंत्र्यांकडे आग्रह

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड जिल्ह्यामध्ये कृषी पिकावर आधारीत केळी, मिरची आणि सोयाबीनचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होत असून बारड ता. भोकर येथे केळी क्लस्टर केंद्र, धर्माबाद येथे मिरची संशोधन केंद्र आणि कासराळी ता. बिलोली येथे सोयाबीन प्रक्रिया केंद्र उभारण्यास तात्काळ मंजुरी देण्यात यावी, अशी मागणी खासदार रविंद्र वसंतराव चव्हाण यांनी पालकमंत्री अतुल सावे यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

पालकमंत्री अतुल सावे १ मे रोजी नांदेड दौऱ्यावर आले असता खासदार रविंद्र चव्हाण यांनी त्यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी निवेदन दिले.

दिलेल्या निवेदनात नमूद केले की, नांदेड जिल्ह्यात केळी पिकांसाठी क्टस्टरची उभारणी, मिरचीसाठी संशोधन आणि सोयाबीन आधारीत विविध प्रक्रिया करण्याचे केंद्र निर्माण करणे अत्यंत गरजेचे. या तिनही केंद्रासाठी प्रामुख्याने नांदेड जिल्ह्यातील दिशा समितीच्या बैठकीत याबाबतचे ठराव पारीत करण्यात आलेले आहेत आणि त्यास दिशा समितीच्या सर्व सदस्यांनी सहमती दर्शविलेली आहे. या तिनही केंद्रास मंजूरी देऊन अधिसूचना काढण्याबाबत राज्य शासनाकडे शिफारस करण्यात यावी, अशी मागणी खासदार चव्हाण यांनी केली.



तसेच खासदार रविंद्र चव्हाण यांनी नायगाव येथे बीओटी तत्त्वावर बसस्थानक उभारण्याची मागणीही पालकमंत्र्यांकडे केली आहे. नांदेड जिल्ह्यातील नायगाव हे तालुक्याचे ठिकाण असून नांदेड ते हैदराबाद तेलंगणा व कर्नाटक राज्य महामार्गावर असलेले ठिकाण आहे. या ठिकाणी अनेक वर्षांपासून बसस्थानकाची मागणी प्रलंबित आहे. तत्कालीन आमदार वसंतराव चव्हाण यांच्या मागणीनुसार तत्कालीन मुख्यमंत्री, परिवहनमंत्री यांचे सुचनेनूसार मुख्य रस्त्यालगत असलेल्या महसूल विभागाच्या गोदामाची जागा बसस्थानकाला देण्याबाबत आदेशीत करून गोदामासाठी तहसिलच्या जवळ पर्यायी जागा उपलब्ध करून देण्याचे आदेशही देण्यात आले आहेत. त्यानुसार गोदाम बांधून पूर्ण झाले, पण गावातील रस्त्यालगतची जागा तशीच मोकळी आहे. आणि अद्याप बसस्थानक झाले नाही. त्या जागेवर अतिक्रमण होण्याची दाट शक्यता आहे म्हणून सदरची जागा महसूल विभागाकडून परिवहन विभागाकडे हस्तांतरीत करून बीओटी तत्वावर बसस्थानक बांधण्यात यावे. जेणे करून प्रवाशांची सोय आणि सुविधा होईल. तसेच विभागाचे आर्थिक उत्पन्न वाढेल. यासंदर्भात परिवहन मंत्री, प्रतापराव सरनाईक यांना १९ मार्च रोजी निवेदन सादर करण्यात आले आहे, असे या नमूद करण्यात आले आहे.

यासाठी जिल्हाधिकारी तसेच परिवहन विभाग नांदेड यांच्यामार्फत अहवाल महाराष्ट्र शासनाकडे पाठविण्याबाबत सुचित करण्यात यावे, अशीही मागणी खासदार चव्हाण यांनी निवेदनाद्वारे केली.

CMYK

# चंदेरी

## ‘छावा’ फेम अभिनेता लवकरच होणार बाबा

### कवी कलश यांची साकारली होती भूमिका...

**छत्रपती संभाजी महाराज यांची शौर्यगाथा सांगणाऱ्या ‘छावा’ चित्रपटाचे सर्वांनीच कौतुक केलं. विकी कौशल, अक्षय खन्नाच्या भूमिकेशिवाय या चित्रपटात असा अजून एक अभिनेता आहे, ज्याच्या अभिनयाने सर्वांच लक्ष वेधलं तो म्हणजे अभिनेता विनीत कुमार सिंह. छत्रपती संभाजी महाराजांसाठी ज्यांनी जीवाचीही पर्वा केली नाही असे कवी कलश यांची भूमिका साकारणारा अभिनेता म्हणजे विनीत कुमार सिंह. ’छावा’ चित्रपटात विनीतने वेगळी छाप पाडली. त्याच्या अभिनयाचे सर्वत्र कौतुक होत असल्याने अभिनेता आनंदी आहे. अशातच आता त्याच्या आनंदात आणखी भर पडली आहे, कारण अभिनेता लवकरच बाबा होणार आहे. याबद्दल त्याने सोशल मीडियाद्वारे माहिती दिली आहे.**

विनीत व त्याची पत्नी रुचिरा यांनी सोशल मीडियावर काही खास फोटो शेअर केले आहेत. दोघांनी आई-बाबा होणार असल्याची गुडन्यूज शेअर करत असं म्हटलं आहे की, नवीन जीवन आणि आशीर्वाद! बाळ लवकरच येत आहे. नमस्ते, लहान बाळा आम्ही तुझे स्वागत करण्यास सज्ज आहोत... त्याने शेअर केलेल्या या पोस्टखाली अनेक कलाकार व चाहत्यांनी दोघांना शुभेच्छा दिल्या आहेत. विनीत आणि रुचिराने असं म्हटलं की, हा टप्पा आमच्या दोघांसाठीही अगदीच खास आहे. आम्ही खूप आनंदी आहोत आणि आमच्या बाळाचे स्वागत करण्यासाठी उत्सुक आहोत. शिवाय पुढे विनीतने असं म्हटलं की मी रुचिराची काळजी घेण्याचा सर्वतोपरी प्रयत्न करतो. जुलैमध्ये बाळाचा जन्म झाल्यानंतर मी पितृत्व रजा घेण्याचा विचार करत आहे. विनीत आणि पत्नी रुचिरा यांनी २०२१ मध्ये विवाहगाठ बांधली. या लग्नाचे फोटो त्यांनी आपल्या सोशल मीडियाद्वारे शेअर केले होते. २०२५ हे वर्ष अभिनेता विनीतसाठी खूपच खास आहे. एकीकडे त्याच्या चित्रपटाला प्रेक्षकांकडून चांगला प्रतिसाद मिळाला. अशातच तो लवकरच बाबाही होणार आहे.



विनीतने सनी देओलबरोबर ‘जाट’मध्येही उत्तम अभिनय केला आहे. यात विनीतने खलनायकाची भूमिका साकारली आहे. ‘सुपरबॉईज ऑफ मालेगाव’मधील अभिनयानेही त्याने सर्वांचं लक्ष वेधून घेतलं आहे. या संस्मरणीय भूमिकांनंतर अभिनेता आता कोणत्या नव्या भूमिकेतून प्रेक्षकांच्या भेटीस येतो हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे.

## अमीषा पटेल ४९ व्या वर्षीही सिंगल का?



**बॉलीवूडमधील सुप्रसिद्ध अभिनेत्रींपैकी एक म्हणजे अमीषा पटेल. ‘कहो ना प्यार है’ या सुपरहिट चित्रपटातून तिने बॉलीवूडमध्ये पदार्पण केलं. त्यानंतर अमीषाने करिअरमध्ये एकापेक्षा एक हिट चित्रपट दिले. बॉलीवूड चित्रपटांचा एक काळ अमीषाने चांगलाच गाजवला आहे. दमदार अभिनयाने इंडस्ट्रीत स्वतःचं स्थान मिळवणारी अमीषा नात्यांबद्दल फारशी नशीबवान राहिली नाही. अभिनेत्रीच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल बोलायचे झाले तर, ती ४९ वर्षीही एकाकी जीवन जगत आहे.**


याच एकाकी जीवनाबद्दल आणि ४९ व्या वर्षी अविवाहित असण्याबद्दल अमीषाने नुकतंच भाष्य केलं आहे. अभिनय क्षेत्रातील व्यस्ततेमुळे कुणाशी लग्न करणं तिला पटत नाही. तसंच एकाकी जीवन जगतानाही मी खूप आनंदी आहे, असं ती म्हणते. विशेष मुलाखतीत अमीषा म्हणाली की, मला वाटतं की, मी माझे आयुष्य ज्या पद्धतीने जगत आहे, त्यामुळे मी खूप आनंदी आहे. मला जोडीदाराची कमतरता भासत नाही. मी माझ्या कामात इतकी व्यस्त आहे की, याची मला गरज नाही. मी अमीषा पटेल आहे आणि माझी मी एकटी आनंदी आहे, असे ती म्हणाली. तिने असं म्हटलं की, की कामाचे अनेक तास, अनियमित वेळापत्रक, कामाची वचनबद्धता यामुळे मला वाटत नाही की, मी नात्याला योग्य तो न्याय देऊ शकते. यानंतर अमीषाला नातेसंबंध तिच्या प्राधान्य यादीत आहेत का? असे विचारले असता ती म्हणाली, देवाच्या कृपेने, मला खूप काही मिळाले आहे. कदाचित मी जे काही मागितले आहे. त्यापेक्षा जास्त मिळाले आहे. माझ्या चित्रपटांना बॉक्स ऑफिसवर प्रचंड यश मिळाले आहे आणि मी हे अभिमानाने सांगू शकते. मी अहंकाराने नाही तर हे खरं तेच बोलत आहे. दरम्यान, अभिनेत्री अमीषा पटेल विक्रम भट्ट यांच्याबरोबर पाच वर्षे रिलेशनशिपमध्ये



होती. त्यांच्या नात्याला अभिनेत्रीच्या घरून विरोध होता. या विरोधामुळेच तिचे पालकांशी वाद झाले. नंतर तिने कणव पुरीबरोबरच्या नात्याचीही कबुली दिली होती, पण नंतर दोघांचं ब्रेकअप झालं होतं. प्रिती झिंटाचा एक्स बॉयफ्रेंड असणाऱ्या नेस वाडियालादेखील तिने डेट केले होते. नेसला अमिषाशी लग्न करायचे होते, मात्र तिला करिअर करायचे होते. त्यामुळे हे दोघे वेगळे झाले.

## ३ बड्या कलाकारांची लोकप्रियता खाणारा शापित बंगला...

**दिवंगत सुपरस्टार राजेश खन्ना यांचा बंगला मुंबईतील वांद्रे येथे होता. या बंगल्याचे नाव ‘आशीर्वाद’ होतं. हा बंगला त्यांच्या आयुष्याचा आणि करिअरचा एक महत्त्वाचा भाग होता. समुद्रकिनारी असलेल्या या बंगल्यात राजेश खन्ना १९७० च्या दशकात राहायला आले तेव्हा यशाच्या शिखरावर होते. पण नंतर मात्र त्यांच्या करिअरला उतरती कळा लागली. २०१२ मध्ये राजेश खन्ना यांच्या निधनानंतर त्यांच्या मुली ट्विंकल आणि रिंकी यांनी शशी किरण शेट्टी यांना ९० कोटी रुपयांना हा बंगला विकला. आता त्याची किंमत सुमारे २२५ कोटी रुपये आहे. पण हा बंगला केवळ काकांनी त्यांच्या आयुष्यातील अनेक वर्षे तिथे घालवली म्हणून प्रसिद्ध नव्हता, तर त्याला शापित बंगला असंही म्हटलं जायचं...**



मुंबईतील कार्टर रोडवरील ‘आशीर्वाद’ बंगल्यात पूर्वी एक अँग्लो-इंडियन कुटुंबीय राहत होते. १९५० च्या दशकाच्या सुरुवातीला हिंदी दिग्गज अभिनेते भारत भूषण यांनी हा बंगला खरेदी केला होता. ‘बैजू बावरा’ आणि ‘मिर्झा गालिब’ सारख्या हिट चित्रपटांमध्ये अभिनयासाठी लोकप्रिय असलेले भारत भूषण यांची दिलीप कुमार आणि राज कपूर यांच्याशी बरोबरीची स्पर्धा होती. या बंगल्यात काही वर्षे राहिल्यानंतर त्यांचे चित्रपट बॉक्स ऑफिसवर फ्लॉप होऊ लागले. भारत भूषण यांची आर्थिक परिस्थिती इतकी खराब झाली की कर्ज फेडण्यासाठी त्यांना त्यांचा बंगला विकावा लागला. भारत भूषण हे पहिले होते ज्यांच्यासाठी हा बंगला दुर्दैवी ठरला. भारत भूषण यांच्यानंतर जुबली कुमार राजेंद्र कुमार यांनी ६० च्या दशकात हे घर ६०,००० रुपयांना खरेदी केलं होतं. आधीच्या स्टारप्रमाणेच, राजेंद्र कुमार यांच्या करिअरलाही हे घर घेतल्यावर उतरती कळा लागली. त्यांचे चित्रपट बॉक्स ऑफिसवर फ्लॉप झाले. त्यानंतर राजेंद्र कुमारकडे बंगला विकण्याशिवाय पर्याय नव्हता. राजेंद्र कुमार यांचा बंगला इंडस्ट्रीचे पहिले सुपरस्टार म्हणून ओळखले जाणारे राजेश खन्ना यांनी विकत घेतला होता.

राजेश खन्ना यांनी ७० च्या दशकाच्या सुरुवातीला हा बंगला ३.५ लाख रुपयांना खरेदी केला होता आणि त्याचे नाव आशीर्वाद ठेवले होते. राजेश खन्ना या घरात राहायला आले तेव्हा ते करिअरच्या शिखरावर होते आणि त्यांनी सलग १७ हिट चित्रपट दिले होते. पण हे यश फार काळ टिकलं नाही आणि लवकरच त्यांच्या करिअरला उतरती कळा लागली. राजेश खन्ना यांच्या करिअरला उतरती कळा लागली आणि वैयक्तिक आयुष्यही बरबाद झाले. मात्र त्यांनी तो बंगला सोडला नाही आणि २०११ मध्ये त्यांचं निधन झालं, तेव्हापर्यंत ते त्याच ‘आशीर्वाद’ बंगल्यात राहिले. तीन दिग्गज अभिनेत्यांच्या करिअरला या बंगल्यात राहायला आल्यानंतर उतरती कळा लागली, त्यामुळे या ‘आशीर्वाद’ बंगल्याला शापित म्हटलं जाऊ लागलं.



अभिनेत्री मंजिरी फडणीसची विशेष मुलाखत

## बॉलीवूडमधील संघर्ष, वागणूक, नैराश्य अन् पुन्हा उमेदीने केलेली सुरुवात

**मंजिरी फडणीस ही बॉलीवूड इंडस्ट्रीतील अशा अभिनेत्रींपैकी एक आहे जिने लष्करी पार्श्वभूमी असूनही टीव्ही, ओटीटी, नाटक आणि चित्रपट अशा प्रत्येक माध्यमात काम केले आहे. जाने तू या जाने ना सारख्या चित्रपटांमधून रातोरात लोकप्रिय झालेल्या मंजिरीला इंडस्ट्रीत बराच काळ वाट पाहावी लागली आणि संघर्ष करावा लागला. सध्या ती तिच्या पुणे हायवे या नवीन चित्रपटामुळे चर्चेत आहे.**

मंजिरी सांगते, की तिचा २० वर्षांचा कारकिर्दीचा काळ संघर्षाने भरलेला होता. जेव्हा बॉलीवूडमधील कौटुंबिक पार्श्वभूमी नसते, तेव्हा तुमच्यासाठी कोणतीही यंत्रणा काम करत नाही. तुम्ही कुठेतरी दुर्लक्षित राहता. जाने तू या जाने ना हा माझा पहिला चित्रपट खूप गाजला. त्या वर्षी माझ्या पहिल्या चित्रपटासाठी मला अनेक पुरस्कार मिळाले. सगळे माझे कौतुक करत होते, पण त्यानंतर कोणत्याही दिग्दर्शकाने मला इतकी दमदार भूमिका दिली नाही. मला नायकाचा मित्र किंवा दुसऱ्या क्रमांकाच्या मुख्य भूमिकेसारख्या सहाय्यक भूमिकांमध्ये टाइपकास्ट व्हायचे नव्हते. मी चांगल्या भूमिकेची वाट पाहत होते, जी मला कधीच मिळाली नाही. या काळात मी अनेक चित्रपटांमध्ये काम केले, पण ते तितके मोठे नव्हते. माझा मानसिक संघर्ष बराच काळ चालला.



### शरीराबद्दल अन् कुरळ्या केसांबद्दल खूप ऐकावे लागलेय...

मंजिरीची गणना इंडस्ट्रीतील सुंदर अभिनेत्रींमध्ये केली जाते. सौंदर्याच्या बनावट मानकांबद्दल ती म्हणते, बघा, हळूहळू परिस्थिती बदलत आहे. पूर्वी फक्त गोऱ्या मुलींनाच सौंदर्याचा दर्जा मानला जात असे. पण आता तसे राहिलेले नाही. आज प्रियांका चोप्रा आणि दीपिका पदुकोण यांनी तो दर्जा बदलला आहे. एक काळ असा आला जेव्हा सडपातळ आणि उंच मुलींना सुंदर मानले जात असे, पण नंतर शरीराच्या सकारात्मकतेबद्दलच्या नवीन काळातील जाणीवेने तेही बदलले. जेव्हा मी इंडस्ट्रीत आले तेव्हा सांगण्यात आले की मी सुंदर नाही, मला बारीक व्हायला हवे, मग मी ब्रेड आणि रोटी सोडून दिली. मी भाज्या आणि डाळी खायचे. माझ्या कुरळ्या केसांबद्दलही मला खूप ऐकावे लागले. माझ्या वीसच्या दशकात, मी माझे कुरळे केस सरळ करण्यासाठी आणि बारीक दिसण्यासाठी सतत संघर्ष करत असे. जेव्हा मी तीस वर्षांची झाले तेव्हा माझे वजन थोडे वाढले, मग मी माझे कुरळे केस आणि तेवढेच वजन टिकवून ठेवण्याचा निर्णय घेतला, मग लोकांना मी आवडू लागले आणि मग मला जाणवले, अरे, मी अशी किती वर्षे वाया घालवली. आता मी स्वतःला स्वीकारले आहे. आपण सर्वजण वैयक्तिकरित्या अद्वितीय आहोत आणि ते समजून घेणे आवश्यक आहे.

### दोन वर्षे रंगभूमीवर काम

मंजिरी म्हणते, की दोन वर्षे रंगभूमीवर काम केल्यानंतर, माझे अभिनय कौशल्य सुधारले होते पण माझी बचत संपली होती. २०१९ हे वर्ष माझ्या कारकिर्दीतील सर्वात कठीण वर्ष होते, जेव्हा मी माझ्या वडिलांना फोन करून म्हटले, जर मी दोन महिन्यांत येथे काहीही साध्य केले नाही तर? माझे वडील लष्करी पार्श्वभूमीचे एक संतुलित आणि बलवान व्यक्ती आहेत. त्यांना आनंद होता की त्यांची मुलगी परत येईल. पप्पांनी फक्त एवढेच सांगितले, काळजी करण्यासारखे काही नाही, तू परत येऊ शकते. आपण तुझे आयुष्य नव्याने सुरू करू. तू मानसशास्त्रातील तुझा अभ्यास पूर्ण करू शकते. मी जवळजवळ आशा सोडून दिली होती पण नंतर मला बारोट हाऊसमध्ये एक खूप शक्तिशाली भूमिका मिळाली. खरं सांगायचं तर, त्या कठीण काळात माझ्या कुटुंबाचा आधार सर्वात महत्वाचा होता. मी लष्करी पार्श्वभूमीची असल्याने, माझा कधीही हार न मानणारा दृष्टिकोन होता. मग या मुंबई शहराने मला सांगितले की मी या जागेसाठीच बनले आहे आणि जेव्हा जेव्हा मी पडले तेव्हा मी उठले...

### वेतनात असमानता...



वेतनातील असमानता हे बॉलीवूड उद्योगातील कटू सत्य आहे. मंजिरी सांगते, की मला वैयक्तिकरित्या कधीही न्यूनगंडाचा सामना करावा लागला नाही. परंतु बॉलीवूडमध्ये किती असमानता आहे हे सर्वांना माहिती आहे. नायकांना जसे वागवले जाते तसे नायिकांना वागवले जात नाही. एक नायक निर्मात्याला ठामपणे एखादी गोष्ट सांगू शकतो. पण नायिका सांगू शकत नाही. जर नायिका काही बोलली तर असे म्हटले जाते की ती राग दाखवत आहे. रागाच्या भरात बोलत आहे. मग तिला पुढे कामच मिळत नाही. एकदा तुमच्यावर काही प्रकारचा टॅग लावला की तुम्ही त्यात अडकून पडता. मला आठवतंय, मी एका प्रोजेक्टवर ३६५ दिवस सतत काम करत होते. संपूर्ण प्रोजेक्ट माझ्यावर आधारित होता. त्या चित्रपटात आणखी तीन कलाकार होते. त्यापैकी एका अभिनेत्याचे गाणे हिट झाले होते आणि त्याचे शूटिंगचे दिवस खूपच कमी होते, तरीही त्याला माझ्यापेक्षा दुप्पट मानधन मिळाले होते. तो इतका प्रसिद्ध नावही नव्हता, पण त्याला माझ्यापेक्षा दुप्पट पैसे मिळत होते, असे ती म्हणाली.

### पुरुषांकडून शक्तीचा गैरवापर

मंजिरी फडणीस ही अशा अभिनेत्रींपैकी एक आहे जिने प्रत्येक माध्यमात स्त्री-केंद्रित भूमिका केल्या आहेत. महिलांच्या प्रश्नांवर ती म्हणते, जगभरात महिलांशी संबंधित अनेक प्रश्न आहेत, परंतु जेव्हा पुरुष सत्तेत असतात तेव्हा अनेक वेळा ते त्यांच्या सत्तेचा गैरवापर करू इच्छितात. हे खूप दुर्दैवी आहे, पण कधीकधी असे घडते. असे बरेच लोक आहेत ज्यांच्याकडे अफाट शक्ती आहे. ते दुसऱ्याचे नशीब बदलू शकतात, परंतु ते चुकीची कारणे निवडतात. मी ती कारणे स्पष्टपणे नाकारते. मी असे म्हणणार नाही की मी बळी आहे. जर मी बळी असते तर हार मानली असती. मला जे योग्य वाटले ते आजवर करत आली आहे. प्रगती मंदावली आहे, पण आज मी इथे आहे...

### तर मी इंडस्ट्री सोडेन...

दीड दशकाहून अधिक काळ इंडस्ट्रीत काम करणाऱ्या मंजिरीच्या कारकिर्दीत एक काळ असा आला जेव्हा तिने दोन वर्षांचा ब्रेक घेतला. ते कारण सांगताना ती म्हणाली, की हे २०१७ मधील आहे, मी अशा टप्प्यातून जात होते जिथे मला अशा व्यावसायिक भूमिका मिळत होत्या ज्या मला आवडत नव्हत्या. त्याच त्याच प्रकारच्या भूमिका येत होत्या, गोड मुलगी, शेजारची मुलगी इत्यादी. दुर्दैवाने, चित्रपट उद्योगाला माझी क्षमता दिसली नाही आणि एक अभिनेत्री म्हणून हे माझ्यासाठी खूप निराशाजनक होते. जरी मी माझ्यासमोर येणाऱ्या संधींमधून सर्वोत्तम भूमिका निवडत होते, तरीही मला ठोस भूमिका मिळत नव्हत्या. मग मी मनाशी ठरवलं की जरी मला इंडस्ट्री सोडावी लागली तरी मी कोणत्याही सामान्य भूमिकेला सहमत होणार नाही.

## सुकेश चंद्रशेखरवर सीरिज येणार?

**अभिनेत्री जॅकलिन फर्नांडिस ही बॉलीवूडमधील प्रसिद्ध अभिनेत्रींपैकी एक आहे. जॅकलिन मूळची श्रीलंकेची असली तरी भारतात तिनं तिच्या अभिनय क्षेत्रातील कामामुळे प्रेक्षकांची मनं जिंकली आहेत, त्यामुळे तिचा मोठा चाहता वर्ग असल्याचेही पाहायला मिळते; तर जॅकलिन कायम कुठल्या न कुठल्या कारणामुळे चर्चेत असते. परंतु, सध्या ती एका वेगळ्याच कारणामुळे चर्चेत आली आहे.**

जॅकलिन फर्नांडिस सध्या चर्चेत आलीये ते सुकेश चंद्रशेखरमुळे. काही दिवसांपूर्वी सुकेशने कोट्यावधींचा घोटाळा केल्याचं प्रकरण उघडकीस आलं होतं. यानंतर सुकेशला शिक्षा ठोठवण्यात आली. सुकेश चंद्रशेखर सध्या तिहार तुरुंगात शिक्षा भोगतोय. अशातच आता सुकेशच्या आयुष्यावर अधारित लवकरच ओटीटीवर एक सीरिज येणार असल्याची चर्चा रंगली आहे. या सीरिजमध्ये सुकेशचा आतापर्यंतचा प्रवास, त्याने केलेले घोटाळे, त्याच्या आयुष्यात असलेली महत्त्वाची माणसं या सगळ्यांचा उल्लेख असणार आहे आणि यामुळेच जॅकलिन फर्नांडिस पुन्हा चर्चेत आली आहे. सुकेश व जॅकलिन हे रिलेशनशीपमध्ये असल्याचं म्हटलं जातं. सुकेश तुरुंगात असतानाही त्यांने मागे जॅकलिनला पत्र पाठवलं होतं, त्यामुळे आता सुकेशवर आधारित सीरिजची चर्चा सुरू असल्याने जॅकलिनलाही याबाबत विचारणा झाल्याचं समोर आलं आहे. जॅकलिनने अद्याप तिची बाजू सांगितली नसून सीरिजमध्ये तिला कशाप्रकारे दाखवण्यात येईल याबाबत शाशंक असल्याचं म्हटलं जातय. ही सीरिज २०२६ मध्ये येणार असल्याची चर्चा सुरू आहे. दरम्यान,



जॅकलिनने अधिकृतपणे याबाबत अजून काहीही भाष्य केलं नाहीये. याव्यतिरिक्त जॅकलिनच्या कामाबद्दल बोलायचं झाल्यास ती शेवटची सोनू सूदसोबत ‘फतेह’ चित्रपटात दिसली होती. आता लवकरच ती अजय देवगणबरोबर ‘रेड २’मध्ये दिसणार आहे. याचसह तिचा ‘हाऊसफुल ५’ हा चित्रपटात यावर्षी प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटात अक्षय कुमार, रितेश देशमुख, संजय दत्त, कृती सेनन, अभिषेक बच्चन, नाना पाटेकर, जॅकी श्रॉफ, कीर्ती खरबंडा यांसारखे कलाकार पाहायला मिळणार आहेत.

## पाहताक्षणी साजिरीला आवडला होता अमेय

अभिनेता अमेय वाघ हा मराठी सिनेसृष्टीतील आघाडीच्या अभिनेत्यांपैकी एक आहे. नाटक, मालिका, चित्रपट आणि वेब सीरिज यांमध्ये वैविध्यपूर्ण भूमिका साकारत अमेयने प्रेक्षकांची मन जिंकली आहेत. अमेय व साजिरी हे दोघेही एकाच कॉलेजमधून शिक्षण घेत होते. अमेयला कॉलेजमध्ये असल्यापासूनच अभिनयाची आवड होती, त्यामुळे तो अनेक नाटकांमध्ये भाग घेत असे. अशातच एक दिवस साजिरी तिच्या मैत्रिणीसह अमेयचं एक नाटक पाहायला गेली असताना तिथे अमेयला पाहिल्यानंतर पहिल्या भेटीतच साजिरीला अमेय आवडला होता आणि तिने त्याला पहिल्या भेटीतच आपण डेटवर जायचं का? असं विचारलं होतं. पण, अमेयने मला अभिनयावर फोकस करायचा आहे असं म्हणत नकार दिला होता. परंतु, नंतर साजिरीनेच पुन्हा एकदा एक महिन्याच्या कालावधीनंतर कॉलेजमध्ये सर्वांसमोर अमेयला आतातरी मला हो म्हण... असं म्हटलं होतं. यानंतर पुढे अमेयनेच स्वतः गुलाबाचं फूल व ग्रीटिंग कार्ड देऊन साजिरीला गुडघ्यावर बसून प्रपोज केलं होतं. याबद्दलचा किस्सा अमेय व साजिरी यांनी ‘होम मिनिस्टर’ या कार्यक्रमात सांगितला आहे. पुढे २ जुलै २०१७ साली अमेय व साजिरी यांनी एकमेकांसह लग्न केलं; तर आता या दोघांच्या लग्नाला जवळपास आठ वर्षे होत आली आहेत. दरम्यान, अमेयचं नुकतंच छोट्या पडद्यावर पुनरागमन झालं असून तो ‘स्टारप्रवाह’ वाहिनीवरील ‘शिट्टी वाजली रे’ या कार्यक्रमात सूत्रसंचालकाच्या भूमिकेत पाहायला मिळत आहे. विशेष म्हणजे अमेय तब्बल आठ वर्षांनी सूत्रसंचालन करत असल्याचं त्याने सांगितलं आहे.

# महाराष्ट्र राजभवन येथे महाराष्ट्र व गुजरात राज्य स्थापना दिवस



**मुंबई (प्रतिनिधी)**–महाराष्ट्र व गुजरात या दोन राज्यांचे देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात तसेच जनतेमध्ये राष्ट्रभक्तीची भावना जागविण्यात अनन्यसाधारण असे योगदान आहे. भाषावार प्रांतरचनेनंतर महाराष्ट्र व गुजरात ही दोन राज्ये निर्माण झाली तरी उभय राज्यांचा आत्मा एकच आहे, असे प्रतिपादन राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी केले.

केंद्र सरकारच्या 'एक भारत श्रेष्ठ भारत' उपक्रमांतर्गत महाराष्ट्र तसेच गुजरात या दोन राज्यांचा राज्य स्थापना दिवस राज्यपाल आणि राज्य विद्यापीठांचे कुलपती सी. पी. राधाकृष्णन यांच्या उपस्थितीत राजभवन मुंबई येथे साजरा करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाचे आयोजन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या सहकार्याने करण्यात आले होते.

महाराष्ट्र व गुजरात या राज्यांनी भारताला अनेक महान राष्ट्रपुरुष दिले असून आज त्यांची ओळख त्यांच्या मूळ राज्यापुरती मर्यादित न राहता राष्ट्रव्यापी झाली आहे. महाराष्ट्र भूमीचे सुपुत्र छत्रपती शिवाजी महाराज हे संपूर्ण देशाकरिता आदर्श आहेत, तर गुजरातचे सुपुत्र महात्मा गांधी यांचे अहिंसेचे तत्वज्ञान आज संपूर्ण जगाकरिता मार्गदर्शक ठरले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशात लोकशाही रुजविण्यात मोठे योगदान दिले. आज गुजरात व महाराष्ट्र ही राज्ये देशाच्या अर्थव्यवस्थेत मोलाचे योगदान देत आहेत असे राज्यपालांनी सांगितले.

महाराष्ट्र व तामिळनाडूच्या संबंधांचा ऐतिहासिक दाखला देताना राज्यपालांनी छत्रपती शिवाजी महाराजांनी तामिळनाडू येथील जिंजी, वेल्लोर येथील किल्ले जिंकले होते तसेच तिरुवन्नामलै येथील शिव मंदिराची प्रतिष्ठापना करून धर्म रक्षणाचे कार्य केले होते, असे सांगितले. तंजावर येथील भोसले राजांनी आपल्या 'सरस्वती महाल' ग्रंथालयात दुर्मिळ असे तामिळ साहित्य जपून ठेवले. या सांस्कृतिक एकीमुळे आज भारत महान राष्ट्र झाले आहे असे सांगताना देश आपली एकात्मता यापुढेही कायम राखत जगातील पहिल्या क्रमांकाचे राष्ट्र होईल, असा विश्वास राज्यपालांनी यावेळी व्यक्त केला.

विविध धर्म व पंथांचे पंथाचे लोक, विभिन्न भाषा बोलणारे लोक या देशात राहत असून देखील भारत एकसंध राष्ट्र कसे आहे असा अनेक जागतिक नेत्यांना प्रश्न पडतो. परंतु भिन्न भाषा, भिन्न पोशाख व भिन्न खाद्य संस्कृती असली तरी देखील या देशाला धर्म व संस्कृतीचे अधिष्ठान आहे, असे सांगून एकात्मतेचे हे अधिष्ठान जपत भारत विकसित राष्ट्र होईल असा विश्वास राज्यपालांनी यावेळी व्यक्त केला.यावेळी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र व गुजरात राज्यांचे लोकनृत्य व गीते यांचा उत्कृष्ट कार्यक्रम सादर केल्याबद्दल राज्यपालांनी विद्यापीठातील विद्यार्थ्यांना कौतुकाची थाप दिली. बृहन्मुंबई महानगर पालिकेच्या संगीत विभागातील शिक्षक – कलाकारांनी देखील यावेळी एक पोवाडा सादर केला.

# मराठवाड्यात तापमानाचा कहर; धरणांनी गाठला तळ, नागरिकांना पाणी टंचाईच्या झळा

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)**– मराठवाड्यात उन्हाचा पारा वाढताच नागरिकांना पाणी टंचाईच्या ( ) झळा बसत आहेत. धरणातील पाणीसाठा झपाट्याने कमी होत आहे. मोठ्या धरणांत ४४ टक्के पाणीसाठा असून मध्यम प्रकल्प धरणांत ९ टक्के आणि लघु प्रकल्पात केवळ १९ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. लघु प्रकल्पांवर अवलंबून असलेल्या गावांत टँकरने पाणीपुरवठा सुरू आहे.

मराठवाड्यात पाणी टंचाई वाढली असून बहुतांश धरणांनी तळ गाठला आहे. लहान-मोठ्या गावात टँकरने पाणीपुरवठा सुरू आहे. मोठ्या शहरातही पाणीपुरवठ्याचे वेळापत्रक विस्कळीत झाले आहे. छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, परतूर, माजलगाव शहरात आठ ते दहा दिवसांनी पाणीपुरवठा करण्यात येत आहे.

विभागातील मोठ्या ११ धरणांत ४४ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. ७५ मध्यम प्रकल्पांत ९.१२ टक्के, ७५१ लघु प्रकल्पात १९.९६ टक्के, गोदावरी नदीवरील १५ बंधाऱ्यात २६ टक्के आणि तेरणा, मांजरा व रेणा नदीवरील २७ प्रकल्पात ८९ टक्के पाणीसाठा आहे. विभागातील एकूण ८७९ प्रकल्पात ४३.८३ टक्के पाणीसाठा आहे. मध्यम आणि लघु प्रकल्पांनी तळ गाठल्यामुळे पाणी टंचाई वाढली आहे. एका लघु प्रकल्पावर १० ते १५ गावे अवलंबून आहेत. या प्रकल्पातून उन्हाळ्यात पिण्याचे पाणी उपलब्ध होते. सध्या पाणी शिल्लक नसल्यामुळे नागरिकांची गैरसोय वाढली आहे. गंगापूर, वैजापूर तालुक्यात पाण्याचे आवर्तन मिळाले नसल्यामुळे उन्हाळी पिकांना फटका बसला आहे.

पिण्याचे पाणी, उद्योग आणि सिंचनासाठी चार जिल्हे अवलंबून असलेल्या जायकवाडी धरणात ४३ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. येलदरी ५७, सिद्धेश्वर ३३, माजलगाव १८, मांजरा ३२, उर्ध्व पेनगंगा ५१, निम्न तेरणा ५४, निम्न मनार ४७, विष्णुपुरी ३१, निम्न दुधना ३५ आणि सिना कोळेगाव २१ टक्के असा धरणनिहाय पाणीसाठा आहे. मध्यम प्रकल्पांतही कमी पाणीसाठा शिल्लक आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील १६ मध्यम प्रकल्पांत २८ टक्के पाणीसाठा आहे. जालना जिल्ह्यातील सात मध्यम प्रकल्पात २१ टक्के, बीडमधील १६ प्रकल्पात ३० टक्के, लातूर जिल्ह्यातील आठ प्रकल्पात २३ टक्के, धाराशिवमधील १७ प्रकल्पात २८ टक्के, नांदेडमधील नऊ प्रकल्पात ३० टक्के आणि परभणी जिल्ह्यातील दोन मध्यम प्रकल्पात २६ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे, असे जलसंपदा विभागाच्या अहवालात म्हटले आहे.

## श्वास गुदमरुन दोघांचा मृत्यू

**सोलापुर(प्रतिनिधी)**–पाण्याची टाकी साफ करण्यासाठी टाकीत उतरलेल्या दोघांचा श्वास गुदमरुन मृत्यू झाल्याची घटना सोलापुरातल्या अक्कलकोट रोड एमआयडीसी इथं घडली आहे. या दुर्दैवी घटनेत सागर नारायण कांबळे या २० वर्षीय तरुणाचा आणि सिद्धराम यशवंत चलगेरी या २८ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला आहे. अक्कलकोट रोड एमआयडीसी परिसरातील एका युनिफॉर्म तयार करणाऱ्या कारखाण्यातील पाण्याची टाकी साफ करण्यासाठी तिघे व्यक्ती गेले होते, यावेळी ही घटना घडली आहे.

## लॉजवर येणाऱ्या सर्वांचे डॉक्युमेंट तपासा, पोलिसांच्या सूचना

**पुणे(प्रतिनिधी)**–लॉजवर राहायला येणाऱ्या सर्व ग्राहकांची कागदपत्रे व्यवस्थितपणे तपासून रजिस्टरमध्ये नोंद करा, अशा सूचना पुणे पोलिसांनी लॉज मालक आणि चालकांना दिल्या आहेत. जम्मू आणि काश्मीर येथील पहलगाममध्ये नुकत्याच झालेल्या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर सुरक्षेच्या दृष्टिकोनातून खबरदारीची पावलं उचलण्यात आली आहेत.

लॉजवर राहायला येणाऱ्या सर्व ग्राहकांची कागदपत्रे व्यवस्थितपणे तपासून रजिस्टरमध्ये नोंद करा, अशी सूचना पुणे पोलिसांनी लॉजचे मालक-चालक यांना केली आहे.

## शिर्डीच्या साई संस्थान मंदिराला बॉम्बने उडवण्याची धमकी

**शिर्डी(प्रतिनिधी)** शिर्डीच्या साई संस्थान मंदिराला बॉम्बने उडवण्याची धमकी देण्यात आली आहे. अज्ञात व्यक्तीने ई मेल करुन ही धमकी दिली आहे. या प्रकरणी पोलीस तपास सुरू आहे. शिर्डीच्या साईबाबांचे जगभर लाखो भक्त आहेत. हे भक्त शिर्डीत साई संस्थान मंदिरात येऊन साईबाबांना पाया पडणे पसंत करतात. दररोज शिर्डीच्या साई संस्थान मंदिरात भाविकांची रिघ लागलेली असते. महत्त्वाच्या दिवशी साईचरणी लीन होण्यासाठी लाखो भक्त येतात. यामुळे मंदिरासाठी कायमस्वरुपी बंदोबस्ताची व्यवस्था करण्यात आली आहे. शिफ्ट ड्युटी स्वरुपात २४ तास आठवड्याचे सातही दिवस मंदिराचे संरक्षण केले जाते. पण धमकीला ई मेल आल्यामुळे सुरक्षा रक्षकांचा ताफा आणि शिर्डी पोलीस यांच्या कामात वाढ झाली आहे. इ मेल नेमका कोणी केला याचा तपास सुरू आहे. मंदिराच्या बंदोबस्ताचा अधिकाऱ्यांनी नव्याने आढावा घेतला आणि तो आणखी चोख केला आहे. सायबर तज्ज्ञांच्या मदतीने पोलीस इ मेल नेमका कोणी केला याचा शोध घेत आहेत. संपूर्ण मंदिरात तसेच मंदिराबाहेर ठिकठिकाणी सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या मदतीने परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवले जात आहे.

## अकाली जन्मलेल्या बालकांमध्ये अंधत्व रोखण्यासाठी एआयचा वापर; ९५ टक्के अचूक निदान शक्य

**पुणे(प्रतिनिधी)** मुदतपूर्व जन्मलेल्या नवजात बालकांमधील डोळ्यांच्या (रेटिनोपॅथी ऑफ प्री-मॅच्युरिटी, आरओपी) या आजाराचे निदान कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (एआय) मदतीने करण्यासाठी पुण्यात अभ्यास करण्यात येत आहे. प्राथमिक टप्प्यातील अभ्यासानुसार एआय सुमारे ९५ टक्के अचूक निदान करीत असल्याचे समोर आले आहे.

एच. व्ही. देसाई आय हॉस्पिटल आणि एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीच्या एकत्रित प्रयत्नांतून आजाराचे निदान करण्यासाठी नवीन एआय अल्गोरिदमवर अभ्यास सुरू आहे. हा अभ्यास २०१८ मध्ये सुरू झाला असून, पुढील दोन वर्षांत पूर्ण होण्याची शक्यता आहे. या अभ्यासातील काही भाग फेब्रुवारीत 'मेथड एक्स' या शास्त्रीय नियतकालिकेत प्रकाशित झाला आहे. या संशोधनाचे नेतृत्व देसाई आय हॉस्पिटलच्या वैद्यकीय संचालक डॉ. सुचेता कुलकर्णी आणि 'एमआयटीडब्ल्यूपीयू' च्या प्राध्यापिका व एआय तज्ज्ञ डॉ. रंजना अग्रवाल करत आहेत.

डॉ. सुचेता कुलकर्णी म्हणाल्या, 'मुदतपूर्व जन्मलेल्या बाळांच्या डोळ्यांच्या तपासणीसाठी वापरल्या जाणाऱ्या कॅमेरामध्ये आम्ही एआय आधारित ऑटोमेटेड सिस्टीम अंतर्भूत करण्याचा प्रयत्न करीत आहोत. निदान करताना कॅमेराचा वापर, डोळ्यांच्या पडद्यात तयार झालेल्या रक्तवाहिन्या, डोळ्यांमधून मेंदूकडे जाणाऱ्या नसांच्या तपासणीसाठी केला जातो. साधारणतः अशा बाळांमधील १० टक्के बाळांना रेटिनोपॅथी ऑफ प्री-मॅच्युरिटीवरील उपचारांची गरज भासते. मात्र, ९० टक्के बाळांना उपचाराची गरज लागत नाही. एआय टूल कॅमेऱ्यात अंतर्भूत करता आल्यास सहज निदान करता येईल.

दुर्गम भागातील टेक्निशियनलाही तपासणी करणे शक्य होणार आहे. प्राथमिक टप्प्यातील अभ्यासात एआय टूल सुमारे ९५ टक्के अचूकतेने निदान करू शकेल, असे दिसून आले आहे. मुदतपूर्व जन्मलेल्या बाळांचे 'आरओपी' साठी पहिल्या चार आठवड्यांत निदान होणे गरजेचे आहे. आजाराचे निदान झाल्यावर लेझर थेरपी किंवा इंजेक्शन्सद्वारे उपचार केले जातात.

## पाकिस्तानी जहाजांवर भारतात प्रवेशबंदी

**नवीदिल्ली(प्रतिनिधी)**–भारत सरकारने पाकिस्तानी जहाजांवर देशात प्रवेशबंदी लागू केली आहे. कोणत्याही भारतीय बंदरात तसेच भारताच्या सागरी हद्दीत पाकिस्तानचे जहाज प्रवेश करू शकत नाही अथवा थांबू शकत नाही; असा आदेश केंद्र सरकारने जारी केला आहे. याआधी भारत सरकारने पाकिस्तानी मालाच्या आयातीवर भारतात बंदी लागू केली आहे. केंद्र सरकारने आधीच पाकिस्तानी विमानांना भारतात आणि भारताच्या हवाई क्षेत्रात बंदी लागू केली आहे.

पहलगाम येथे पाकिस्तान पुरस्कृत अतिरेक्यांनी २६ नागरिकांची हत्या केली. अतिरेकी हल्ल्यात पाकिस्तानचाच हात असल्याचे पुरावे भारताला मिळाले. यानंतर भारत सरकारने पाकिस्तान विरोधात कठोर पवित्रा घेतला आहे. भारतात आणि भारताच्या सागरी क्षेत्रात तसेच बंदरांवर पाकिस्तानच्या जहाजांना बंदी घालण्यात आली आहे. पाकिस्तानी विमानांना भारतात आणि भारताच्या हवाई क्षेत्रात बंदी घालण्यात आली आहे. पाकिस्तानी मालाच्या आयातीवरही भारतात बंदी घालण्यात आली आहे. भारताने पाकिस्तानच्या नागरिकांचे व्हिसा रद्द केले आहेत तसेच पाकिस्तानच्या भारतातील दुतावासातले कर्मचारीही कमी केले आहेत. सिंधू नदी पाणी वाटप करार स्थगित करण्यात आला आहे.

## साहित्य अकादमी भाषांतर पुरस्कार २०२५ साठी अर्ज सादर करण्याचे आवाहन

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)**–

साहित्य अकादमी भाषांतर पुरस्कार वर्ष २०२५ साठी अर्ज सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अर्ज सादर करण्याची शेवटची तारीख ३१ मे २०२५ आहे.

साहित्य अकादमी १९८९ पासून मान्यताप्राप्त २४ भारतीय भाषांपैकी प्रत्येकी २४ भाषांमध्ये साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार प्रदान करत आहे.

साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार दरवर्षी भारतीय अनुवादकांनी आसामी, बंगाली, बोडो, डोगरी, इंग्रजी, गुजराती, हिंदी, कन्नड, काश्मिरी, कोकणी, मैथिली, मल्याळम, मणिपुरी, मराठी, नेपाळी, ओडिया, पंजाबी, राजस्थानी, संस्कृत, संथाली, सिंधी, तामिळ, उर्दू आणि तेलुगू या भाषांमध्ये अनुवादित केलेल्या उत्कृष्ट साहित्यकृतींना दिला जातो.

हे पुरस्कार एका दिमाखदार समारंभात प्रदान केले जातात. पुरस्काराचे स्वरूप ५०,००० रुपये आणि ताम्रपट असे आहे.

साहित्य अकादमी यांनी भारतीय अनुवादकांना, त्यांच्या हितचिंतकांना आणि प्रकाशकांना २०२५ च्या साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कारासाठी मान्यताप्राप्त सर्व २४ भारतीय भाषांमध्ये अनुवादित पुस्तके सादर करण्याचे आमंत्रण दिले आहे. २०१९, २०२०, २०२१, २०२२ आणि २०२३ मध्ये (म्हणजे १ जानेवारी २०१९ ते ३१ डिसेंबर २०२३ दरम्यान) प्रथमच प्रकाशित झालेल्या पुस्तकांचा पुरस्कारासाठी विचार केला जाईल.

प्रत्येक पुस्तकाच्या १ प्रतीसह अर्ज सादर करण्याची शेवटची तारीख ३१ मे २०२५ आहे. पुरस्काराची सविस्तर माहिती, www.sahitya-akademi.gov.in या वेबसाइटवर उपलब्ध आहे, असे अकादमीच्या वतीने कळविण्यात आले आहे.

## भीषण अपघातात दोघांचा मृत्यू

**वसमत(प्रतिनिधी)** वसमत शहरात माती घेऊन जाणाऱ्या हायवा ट्रकने ऑटोला धडक दिल्याने भीषण अपघात झाला. शहरातील कवठा रोडवरील मदिना चौकात हा अपघात झाला असून यामध्ये दोन जण मृत्युमुखी पडले आहेत, तर दोन बालक गंभीर जखमी झाले आहेत. जखमींवर उपजिल्हा रुग्णालय वसमत येथे उपचार सुरू आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, वसमत शहरात नेहमीच अवैध माती वाहतूक सुरू असते. भरधाव वेगाने माती घेऊन जाणारे हायवा टिप्पर असून यावर महसूल प्रशासनाचे दुर्लक्ष झाल्याचे दिसत आहे. अशातच हायवा चालकाचा वाहनावरील ताबा सुटल्याने झालेल्या अपघातात दोन जणांना आपला जीव गमवावा लागला. या घटनेनंतर माती माफियांसह प्रशासनावर सर्वसामान्य नागरिकांकडून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

## ई-बाईक टॅक्सी धोरणाला राज्यभरात रिक्षाचालकांचा विरोध; २१ मे रोजी महाराष्ट्रभर रिक्षा संघटनांचे आंदोलन

**मुंबई(प्रतिनिधी)**–महाराष्ट्र सरकारने ई-बाईक टॅक्सी सेवा सुरू करण्यास दिलेली परवानगी आता नव्या वादाला तोंड फोडते आहे. या धोरणाला विरोध करत राज्यातील सर्व ऑटोरिक्षा चालक-मालक संघटनांनी एकत्र येत २१ मे रोजी राज्यभरातील प्रादेशिक परिवहन कार्यालयांपुढे आंदोलनाची घोषणा केली आहे.

संयुक्त कृती समितीचे अध्यक्ष शशांक राव यांनी सांगितले की, "सरकारने बेरोजगार तरुणांना रोजगार मिळावा या नावाखाली ई-बाईक टॅक्सी मंजूर केल्या, पण या निर्णयामुळे राज्यातील अंदाजे १.५ लाख रिक्षाचालकांच्या उदरनिर्वाहावर गदा येणार आहे. त्यांनी आरोप केला की, "सरकारने आमच्या सूचना ऐकल्या नाहीत. आम्ही सरकारने नेमलेल्या समितीसमोर आपली भूमिका मांडली होती, तरीही आमच्याशी कोणतीही चर्चा न करता ई-बाईक टॅक्सी मंजूर करण्यात आल्या. हे रिक्षाचालकांच्या हक्कांवर अन्याय आहे.

मुंबई, कोकण, पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा, खान्देश व ग्रामीण भागातील रिक्षा चालक मालक नेत्यांची बैठक २७ एप्रिल रोजी झाली. या बैठकीत २१ मे रोजी एकत्रित आंदोलन करण्याचा निर्णय घेण्यात आला.

दरम्यान, राज्य सरकारने एप्रिल महिन्यात झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत ई-बाईक टॅक्सी धोरणास मंजुरी दिली. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी स्पष्ट केलं की, "हा निर्णय प्रवाशांसाठी स्वस्त प्रवास व नव्या रोजगार संधी निर्माण करणारा आहे. पूर्वी १०० रुपये लागत असलेल्या प्रवासासाठी आता ३० ते ४० रुपये इतका खर्च येईल."

सरनाईक यांनी हेही स्पष्ट केलं की, "पर्यावरणाला हानी पोहोचू नये म्हणून फक्त इलेक्ट्रिक बाईकनाच परवानगी देण्यात येईल आणि महिलांच्या सुरक्षिततेसाठीही विशेष नियम आखले जात आहेत."

सरकारच्या मते, यामुळे संपूर्ण महाराष्ट्रात सुमारे २०,००० तरुणांना रोजगार मिळणार असून केवळ मुंबईतच १०,००० रोजगार संधी निर्माण होतील. परंतु रिक्षा संघटनांचा आक्षेप आहे की, "ही धोरणे पारंपरिक सार्वजनिक वाहतूक प्रणालीला मोडीत काढणारी आहेत. सरकारने तातडीने ई-बाईक टॅक्सी धोरण मागे घ्यावे, अन्यथा संघर्ष अधिक तीव्र केला जाईल."







### नगरपरिषद भोकर
### जाहीर प्रगटन

या जाहिर प्रगटनाअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की,गणेश रूपसिंग राठोड यानी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्व्हे नं.-- गट.नं.-९ जुना वार्ड नं.- ५ मधील प्लॉट नंबर -५ मालमत्ता नं.-- नविन वार्ड नं.- नविन मालमत्ता नं.-गुंठेवारी अधिनियमाअंतर्गत नियमित करून मिळविण्याकरीता नगरपरिषद नोंदणीकृत अर्टीकेट व इंजिनिअर यांच्याद्वारे अर्ज सादर केला आहे. साईज रूंदी दक्षिण उत्तर ५० फुट, लांबी पुर्व पश्चिम ४० फुट चुर्तसिमा पुर्वे -सुभाष लिंगन्ना साईनवार, पश्चिम: गणपत शिंदे, दक्षिण : २० फुट रस्ता, उत्तर :गणेश जिनिंग फॅ क्टरीची हद्द वरील चर्तुसिमेच्या आतील जागेवर गुंठेवारी प्रमाणपत्र देण्यात बाबत कोणाचा काही आक्षेप असल्यास संबंधीतांनी आवश्यक लेखी पुराव्यासह हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत मुख्याधिकारी नगरपरिषद भोकर यांच्याकडे दाखल करावे.मुदतीनंतर प्राप्त हरकती बाबत कोणाचेही उत्तर ऐकून घेतले जाणार नाहीत.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद भोकर**



### नगरपरिषद भोकर
### जाहीर प्रगटन

या जाहिर प्रगटनाअधारे सर्व जनतेस कळविण्यात येते की,हिरामन लक्ष्मण कांबळे यानी या कार्यालयात अर्ज सादर करून भोकर नगरपरिषद हद्दीतील शेत सर्व्हे नं.-- गट.नं.-४८४ जुना वार्ड नं.- ५ मधील प्लॉट नंबर -- मालमत्ता नं.-- नविन वार्ड नं.- नविन मालमत्ता नं.-जी-१४८/१ गुंठेवारी अधिनियमा अंतर्गत नियमित करून मिळविण्याकरीता नगरपरिषद नोंदणीकृत अर्टीकेट व इंजिनिअर यांच्याद्वारे अर्ज सादर केला आहे. साईज रूंदी दक्षिण उत्तर -, लांबी पुर्व पश्चिम - चुर्तसिमा पुर्वे -६.१० मीटर रस्ता, पश्चिम: प्लॉट नंबर १५, दक्षिण :प्लॉट नंबर १९, उत्तर :संजीव दुधारे वरील चर्तुसिमेच्या आतील जागेवर गुंठेवारी प्रमाणपत्र देण्यात बाबत कोणाचा काही आक्षेप असल्यास संबंधीतांनी आवश्यक लेखी पुराव्यासह हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत मुख्याधिकारी नगरपरिषद भोकर यांच्याकडे दाखल करावे.मुदतीनंतर प्राप्त हरकती बाबत कोणाचेही उत्तर ऐकून घेतले जाणार नाहीत.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद भोकर**



### जाहीर प्रगटन

लिहून देणार: सुधीर सुर्यकांत हंबर्डे धंदा. व्यापार रा. तरोडा बु. ता.जि. नांदेड अमित रामानंद शर्मा वय ३९ वर्षे, धंदा. व्यापार रा. वजीराबाद ता.जि. नांदेड

लिहून घेणार:विलास प्रल्हाद चल्लावार,वय ४८ वर्षे. धंदा. व्यापार रा. जोशीसांगवी ता. लोह जि. नांदेड कारणे सौदाचिठ्ठी त्याचा मुद्रांक के ३३ AB १६९९४७ या अधारे सौदाचिठ्ठी लिहून देतो ऐसा जे की, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीतील असलेला एक प्लॉट सौदाचिट्ठी अधारे घेतलेला प्लॉट मौजे सिडको मोंढा मार्केट येथील सर्व्हे क्रं. ५३ मधील प्लॉट क्रं. ८२ सेक्टर G.M.असून ज्याचे एकूण १६७.२५० चौ. मी आहे. सदरी प्लॉट चर्तुसिमा खालील प्रमाणे आहे पुर्वस प्लॉट क्रं. ११५, पश्चिम ११.०० मी रुंद रोड,ऊतरेस प्लॉट क्रं. ८१,दक्षिण प्लॉट क्रं. ८३ या चर्तुसिमेच्या आतील क्षेत्रफळ असलेले एक प्लॉट मी लिहून घेणार यांना सौदाचिठ्ठी अधारे सौदाचिठी लिहून देत आहे. या चर्तुसिमेच्या आतील क्षेत्रफळ असलेला प्लॉट मी लिहून घेणार यांना सौदाचिठी लिहून देत आहे हे की, सदरील क्षेत्रफळ असलेला प्लॉट त्याची एकूण विक्री किंमत ठरली आहे ,आहे. आज दि.३०/०३/२०२५ रोजी बयाणा पोटी नगदी स्वरुपात बयाना पोटी प्राप्त झाले आहेत. तसेच उर्वरीत रक्कमेपैकी सिडकोच्या हस्तांतरणाच्या कागदपत्रावर सहया करतेवेळी शासकिय मुल्यांकना नुसार चेक/आर. टी.जी.एस.द्वारे र देण्याचे ठरले आहे. व राहिलेली उर्वरीत हि रक्कम सह दुय्यम निबंधक यांच्या कार्यालयात नोंदणी रजिस्ट्री करतेवेळी दि.०१/०६/२०२५ रोजी पर्यंत रक्कम देवून रजिस्ट्री करुन घेण्याचे ठरले आहे. दोन महिन्या च्या आत कागदपत्राची कारवाई न झाल्यास उर्वरीत रक्कम देणे बंधनकारक राहील. तसेच ज्या व्यक्तीच्या नावे प्लॉट आहे त्या व्यक्तीला रजिस्ट्री साठी आणन्याची जबाबदारी लिहून देणार यांची राहील.

लिहून घेणार हे सांगतील त्या व्यक्तीच्या नावे रजिस्ट्री करण्याचे ठरले आहे. त्या प्लॉटवर जे काही थकबाकी आसेल ती भरुन देण्याची जबाबदारी लिहून देणार यांची राहील तसेच हे की वरील रजिस्ट्री खतासाठी व हस्तांतरणासाठी लागणारा खर्च हा लिहून घेणार यांना करावा लागेल. सदर दस्तातील मजकूर आम्हांस आभव्या भाषेत वाचून व समजावून सांगीतले जे आमच्या म्हण्याप्रमाणे संगणकीय टंकलीखीत करण्यात आले आहे/आम्ही स्वतः वाचून व समजून घेतला ज्यावर आम्ही लिहून देणार व घेणार असे मिळून नमुद साक्षीदारासमक्ष आपली सही करुन दिले आहे. या खरेदी बाबत कोणाच्ये काही आक्षेप असल्यास आठ दिवसांच्या आत लेखी कळवावे यानंतर नंतर आलेले आक्षेप ग्राह्य धरल्या जाणार नाहीत करीता हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध करीत आहोत

**जाहीर प्रगटन..**
**विलास प्रल्हाद चल्लावार**
**मोबाईल नंबर ९६८९२०४०४२**



### जाहीर प्रगटन

मौजे तरोडा खुर्द नांदेड मनपा हद्दीतील गट नंबर १६८ पैकी प्लॉट नंबर ६ चा दक्षिणेकडील भाग ज्याचा उत्तरेकडील भाग साईज लांबी पुर्व पश्चिम ४०फुट म्हणजे १२.१९ मीटर व रुंदी दक्षिण उत्तर ११ फुट म्हणजे ३.३५ मीटर ज्याचे एकूण क्षेत्र.४४० चौरस फुट म्हणजे ४०.८९ मीटरचा प्लॉट लक्ष्मीबाई चांदबा ढवळे रा.ओमकारेश्वरनगर तरोडा खुर्द मालेगाव रोड नांदेड यांचेकडून बाबाराव मारोतीराव गुमडवाड रा.रावणगाव ता.मुखेड जि. नांदेड यांनी विकत घेण्याचा सौदा केला असून बयाना म्हणून काही रक्कम दिली आहे.

तरी वरील प्लॉट बद्दल कोणाचा काही हक्क, उजर, दावा आक्षेप सरकारी किंवा निमसरकारी बोजा असेल त्यांनी आपला उजर/ आक्षेप हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्यावर सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या उजर आक्षेप ग्राहय धरल्या जाणार नाही व नंतर सदनिकेचे खरेदी खत करण्यात येईल. करीता हे जाहीर प्रगटन

**जाहीर प्रगटन देणार**
**बाबाराव मारोतीराव गुमडवाड**
**रा.रावणगाव ता.मुखेड जि. नांदेड**
**मो.७५०७५९८६१४**



### Change In Name

My old name is RENUKA SUJIT POLAWAR I AM changing AS New Name. RENUKABAI SUJIT POLAWAR Hence forth her all correspondence will be done As per her new Neme please consider the same. ADD- RADHAKRISHNA RESIDENCY NEAR BK HALL SHREENAGAR NANDED 431604 MO.

### Change In Name

My old name is SUJITKUMAR SUBHASHRAO POLAWAR I AM changing AS New Name. SUJIT SUBHASHRAO POLAWAR Hence forth her all correspondence will be done As per her new Neme please consider the same. ADD- RADHAKRISHNA RESIDENCY NEAR BK HALL SHREENAGAR NANDED 431604 MO.

### Change In Name

My old Name is: MUHAMMED WAHAJUDDIN ABDUL MUKHTAR which now am changing as new name MUHAMMED WAHAJUDDIN Fenceforth My All Correspondence will be done as per my new name. Please consider the same Address: MUHAMMED WAHAJUDDIN H.No. 9-5-504, Hamidiya Colony, Qudwai Nagar, Degloor Naka, Itwara, Dist. Nanded 431604, Mob No: +91 9011624548

स्थलांतर
सिटी मॅक्स डिजिटल कलर
मो.7058766021,9422185282
गड्डम मार्केट,पहिला मजला,
शिवाजी नगर,नांदेड

# गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकूण, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



## रुग्णांना दर्जेदार आणि तात्काळ आरोग्यसेवा पुरवा -आ. बोंढारकर

**नांदेड (प्रतिनिधी)**- विष्णुपुरी येथील शासकीय रुग्णालयात उपचार घेण्यासाठी येणाऱ्या गरजू आणि सर्व-सामान्य रुग्णांना तातडीच्या व दर्जेदार आरोग्यसेवा पुरवा अन्यथा कोणाचीही गैर केली जाणार नाही, असा इशारा देत आ. आनंदराव पाटील बोंढारकर यांनी रुग्णालयाच्या प्रशासनाची कानउघाडणी केली.




आमदार आनंद बोंढारकर यांनी विष्णुपुरी रुग्णालयाच्या प्रशासनाची नुकतीच आढावा बैठक घेतली. या आढावा बैठकीत रुग्णालयातील असुविधां-वरूनही त्यांनी अनेक प्रश्न उपस्थित केले.

नांदेड शहरा लगत असलेल्या विष्णुपुरी येथील डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयातील सुविधांबद्दल रुग्ण आणि नातेवाईकांमधून मोठी नाराजी व्यक्त होत होती. येथील अस्वच्छता, पिण्याच्या पाण्याविषयी गैरसोय, बंद असलेली एमआरआय मशीन, सिटीस्कॅन आणि अन्य सुविधांबाबतही मोठी ओरड होत असताना काल आ. बोंढारकर यांनी विष्णुपुरी रुग्णालयाच्या प्रशासनाची बैठक घेतली. या बैठकीत त्यांनी रुग्णालय प्रशासनाला चांगलेच धारेवर धरले. रुग्णालय परिसरामध्ये कोणत्याही प्रकारे रुग्णांची हेळसांड होणार नाही, त्यांची लुटमार होणार नाही, त्यांना योग्य आरोग्य सेवा जागेवर मिळतील यासाठी रुग्णालय प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात अन्यथा संबंधित कर्मचारी व अधिकाऱ्यांची खैर केली जाणार नाही, असा इशारा त्यांनी दिला.

रुग्णालयामध्ये बंद असलेल्या सर्व यंत्रणा तात्काळ कार्यान्वित कराव्यात. त्यासाठी निधीची कमतरता पडणार नाही. मात्र रुग्णालय प्रशासनाने कोणत्याही कारणास्तव रुग्णांना कोणत्याही आरोग्य तपासणीसाठी बाहेर पाठवणार नाहीत याची काळजी रुग्णालय प्रशासनाने घ्यावी, असे निर्देशही आ. बोंढारकर यांनी दिले.

यावेळी डीन डॉ. सुधीर देशमुख, वैद्यकीय अधीक्षक डॉ. कापसे, नियोजन अधिकारी डॉ. डोळे, शिवसेना जिल्हा प्रमुख विनय पाटील गिरडे, शहर प्रमुख तुलजेश यादव, शहर प्रमुख सुहास खराणे पाटील, तालुका प्रमुख अशोक मोरे, रवी थोरात यांच्यासह सर्व विभागांचे विभागप्रमुख उपस्थित होते.

## यंदा ११ वीची प्रवेश प्रक्रिया होणार केंद्रीय ऑनलाईन पद्धतीने

**नांदेड(प्रतिनिधी)**- शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून इयत्ता ११ वीचे प्रवेश हे शहरी व ग्रामीण दोन्ही भागांसाठी केंद्रीय ऑनलाईन पद्धतीनेच होणार आहेत. त्यामुळे शासनाच्या ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया वेबसाईडवर नेहमी येणाऱ्या वेळापत्रकांना तसेच मार्गदर्शक सुचनांकडे लक्ष द्यावे. तसेच काही अडचणी येत असल्यास तालुका स्तरावर गटशिक्षणाधिकारी कार्यालय, संबंधित माध्य-मिक शाळा व उच्च माध्यमिक विद्यालय तसेच जिल्हा स्तरावर शिक्षणाधिकारी माध्यमिक यांचे कार्यालयात मदत कक्ष लवकरच स्थापण होणार आहे. तसेच वेगळ्याने यथावकाश माहिती दिली जाणार आहे. तरी जिल्ह्यातील सर्व पालक, विद्यार्थी, प्राचार्य, मुख्याध्यापक व उच्च माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांचे व्यवस्थापन यांनी यांची नोंद घ्यावी, असे आवाहन प्राथमिक शिक्षणाधिकारी नांदेड यांनी केले आहे.

मागील काही वर्षापासून राज्यातील मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, औरंगाबाद व अमरावती या महानगरपालिका क्षेत्रातील इयत्ता ११ वीचे प्रवेश हे केंद्रीय ऑनलाईन पद्धतीने चालू आहेत. त्याच पार्श्वभूमीवर राज्य शासनाच्या शालेय शिक्षण विभागाने २५ फेब्रुवारी २०२५ रोजी शासन निर्णय काढून राज्यातील इतर सर्व जिल्ह्यांतील शहरी व ग्रामीण भागातील सर्व उच्च माध्यमिक विद्यालये व कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता ११ वीचे प्रवेश केंद्रीय ऑनलाईन पद्धतीने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून चालू करण्याचे निश्चित केले आहे. त्यानुसार राज्यस्तरावरून ते जिल्हास्तरापर्यंत याची अंमल-बजावणी सुरू झाली आहे. त्या अनुषंगाने जिल्ह्यातील उच्च माध्यमिक शाळांकडून विहित नमुन्यात माहिती घेण्याचे काम अंतिम टप्यात आले आहे. त्यासाठी केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेबाबत पालक, विद्यार्थी व शाळांना माहिती होणे गरजेचे आहे.

केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया पद्धतीनुसार सर्वप्रथम सर्व उच्च माध्यमिक विद्यालयांना त्यांचे संस्थेचे ऑनलाईन रजिस्ट्रेशन शासनाने दिलेल्या वेबसाईटवर करावे लागणार आहे. त्यानंतरच त्यांचे उच्च माध्यमिक विद्यालयासाठी प्रवेश प्रक्रिया सुरु होणार आहे. यासाठी शासनाकडून दिलेल्या वेबसाईटवर सर्व शाळांनी वेळापत्रकानुसार नोंदणी करावी.

नोंदणी करण्यापूर्वी सर्व कॉलेजने काही अभिलेख्यांची पूर्वतयारी शाळास्तरावर करुन ठेवणे गरजेचे आहे. यामध्ये सर्वात महत्त्वाचे म्हणजे आपल्या कॉलेजमध्ये इंटरनेटची सुविधा असणे अत्यंत गरजेचे आहे. विद्यालयस्तरावर विद्यार्थ्यांना सुलभतेने प्रवेश घेता यावेत तसेच विद्यार्थ्यांच्या शंकांचे समाधान यासाठी पूर्णवेळ यंत्रणा कार्यान्वित करावी. माहिती पुस्तिका प्रत्येक विद्यार्थ्यांना पाहता येईल यासाठी शाळास्तरावरच नियोजन करावे. यामध्ये माध्यमिक शाळांची अत्यंत महत्त्वाची भूमिका आहे. शक्यतोवर माध्यमिक शाळांमधूनच विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन प्रवेश भरण्यासाठी सोय करुन देण्यात यावी. उच्च माध्यमिक विद्यालयांनी शासन मान्यता आदेश, मान्यताप्राप्त विषयाचे मंडळ मान्यता आदेश, शाखा अतिरिक्त तुकडी आदेश, अल्पसंख्यांक प्रमाणपत्र, बँक डिटेल्स इत्यादी बाबींची पूर्वीच तयारी करुन ठेवावी. शैक्षणिक शुल्काबाबतचे आवश्यक कागदपत्रे मान्य असणे आवश्यक आहे. प्राचार्यांनी त्यांचे कॉलेजची माहिती वेबपोर्टलवर भरतांना योग्य ती दक्षता घ्यावी. कोणतीही माहिती अंदाजित अथवा चुकीची भरू नये. यामुळे भविष्यात उदभवणाऱ्या परिणामास संबंधित प्राचार्य, व्यवस्थापन जबाबदार राहील. कोणत्याही परिस्थितीत ऑफलाईन झालेले प्रवेश हे इयत्ता १२ वी परीक्षेसाठी ग्राह्य धरले जाणार नाहीत. त्यामुळे ऑनलाईन प्रक्रियेशिवाय इतर कोणत्याही मार्गाने प्रवेश देऊ नयेत. तसेच विद्यार्थ्यांनी देखील असे प्रवेश घेऊ नयेत, असे कळविले आहे.

**विद्यार्थ्यांनी करावयाची कार्यवाही**-विद्यार्थ्यांना इयत्ता १० वीचा निकाल लागण्याअगोदर व निकाल लागल्यानंतर अशा दोन वेळा वेगवेगळी नोंदणी करावी लागते, याची नोंद घ्यावी. प्रत्येक विद्यार्थ्यांना एकच ऑनलाईन फॉर्म भरावयाचा आहे. त्यामुळे फॉर्म भरण्यापूर्वी काही बाबी स्वत: जवळ तयार असणे गरजेचे आहे. यामध्ये इयत्ता १० वीचे गुणपत्रक, टीसी, आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास जातीचे प्रमाणपत्र, नॉनक्रिमिलेयर प्रमाणपत्र, फोटो, अद्ययावत आधारकार्ड, फोटो इत्यादी स्वत: जवळ तयार ठेवणे गरजेचे आहे. विद्यार्थी स्वत:च्या मोबाईलमधून देखील ऑनलाईन प्रवेश अर्ज भरू शकतो किंवा त्याच्या इयत्ता १० वीच्या शाळेतून देखील मुख्याध्यापकांचे मदतीने प्रवेश भरू शकतो. ऑनलाईन अर्ज दोन भागात भरावा लागणार आहे. त्यासाठी शासनाकडून वेबसाईट कार्यान्वित झाल्यावर इयत्ता १० वीचा निकाल लागण्यापूर्वीच भाग-१ भरावयाचा आहे. यासाठी वेबसाईटवर वेळोवेळी वेळापत्रक दिले जाणार आहे. त्याची पाहणी विद्यार्थ्यांनी करणे गरजेचे आहे.

## बलात्कार करून सहा महिन्यांपासून फरार आरोपी एलसीबीच्या जाळ्यात

**नांदेड (प्रतिनिधी)** - शहराच्या भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका बलात्कार प्रकरणात सहा महिन्यांपासून पोलिसांना गुंगारा देणारा आरोपी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पकडला आहे. त्याची कसून चौकशी करून त्यास भाग्यनगर पोलिसांच्या स्वाधीन केले आहे.

बलात्कार प्रकरणात भाग्यनगर ठाण्यात गुरनं ६००/२०२४ कलम १३७ (२,६४,६४ (१) भारतीय न्याय संहिता सह कलम ४,६ पोक्सोमधील आरोपी सुमेध गोपाल लांबा (वय २२ वर्ष, रा. बेलानगर, नांदेड, ता. जि. नांदेड) हा गुन्हा घडल्यापासून फरार असल्याने आरोपीच्या शोधकामी माहितीगार अधिकारी व अंमलदार यांचे पथक तयार करून गुन्ह्यातील आरोपीचा शोध घेऊन त्यास अटक करण्याबाबत आदेश स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांना पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी दिले होते. त्यावरुन उदय खंडेराय यांनी स्थानिक गुन्हे शाखेतील सहाय्यक पोलीस निरीक्षक विठ्ठल घोगरे, पोलीस उपनिरीक्षक हरजिंदरसिंघ चावला व पोलीस अंमलदार यांचे पथक तयार करुन, त्यांना नमूद गुन्ह्यातील आरोपीचा शोध घेण्याबाबत आदेशित केले होते.

या आदेशावरून विठ्ठल घोगरे यांनी त्यांच्या पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी रात्रंदिवस अथक परिश्रम घेवून गुप्त बातमीदारांच्या माहितीवरुन व सायबर सेलने पुरविलेल्या तांत्रिक माहितीवरुन सदर गुन्ह्यातील आरोपी हा नांदेड रेल्वेस्टेशन परिसरात फिरत असल्याची खात्रीशीर माहिती मिळाल्याने टिमसह रेल्वे स्टेशन परिसरात सदर फरार आरोपीचा शोध घेतला असता दि. २ मे २०२५ रोजी वेळ २२:३० वाजताचे सुमारास नांदेड रेल्वे स्टेशन परिसरात एक संशयीत इसम मिळून आल्याने त्यास ताब्यात घेवून त्याला त्याचे नाव, गाव विचारले असता त्याने त्याचे नाव सुमेध गोपाल लांबा, वय २२ वर्षे, व्यवसाय मजुरी, रा. बेलानगर, नांदेड, ता.जि. नांदेड असे सांगितल्याने सदर आरोपी हा पो. स्टे भाग्यनगर गुरनं ६००/२०२४ कलम १३७ (२,६४,६४ (१) भारतीय न्याय संहिता सह कलम ४,६ पोक्सो मधिल आरोपी असल्याचे निष्पन्न झाल्याने पुढील तपास कामी पो.स्टे. भाग्यनगर यांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

## नांदेड ग्रामीण पोलिसांनी रेतीची चोरटी वाहतूक करणारे २ टेम्पो पकडले



**नांदेड (प्रतिनिधी)** - वाळूची चोरटी वाहतूक करणारे दोन टेम्पो नांदेड ग्रामीण पोलिसांच्या गुन्हे शोध पथकाने केलेल्या या कारवाईत टेम्पोसह दोन ब्रास वाळू जप्त करून दोन आरोपीविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जिल्ह्यातील अवैध धंद्यां-विरुद्ध सध्या कारवाई सुरू आहे. या अंतर्गत नांदेड ग्रामीणचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली वाळूची चोरटी वाहतूक करणारे दोन टेम्पो ३ मे रोजी पकडण्यात आले. लातूर फाटा ते विष्णुपुरी रस्त्यावर पेट्रोलिंग करीत असताना (एम. एच. ४३ ए.डी. ०६९७) हा टेम्पो पकडून वाळू जप्त करण्यात आली. या प्रकरणी आरोपी दत्ताराम रामजी लोंढे रा. असर्जन याच्याविरूद्ध गुन्हा नोंद करण्यात आला.

तसेच दुसऱ्या कारवाईत म. बसवेश्वर पुतळा ते कौठा दरम्यान पेट्रोलिंग करीत असताना (एम.एच. ०४ एम.वी. ४६५८) हा टेम्पो पकडून आरोपी शेख जिलानी शे.हशमी रा. वाजेगाव याच्याविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. या दोन्ही कारवाईत ५ लाख १० हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

## महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ शाखा नांदेडच्या नियुक्त्या जाहीर

**नांदेड (प्रतिनिधी)**- महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई जिल्हा शाखा नांदेड अंतर्गत जिल्हा कार्याध्यक्षपदी सकाळचे जिल्हा प्रतिनिधी रामेश्वर काकडे तर सरचिटणीसपदी मराठी अपडेटचे संपादक बापूसाहेब पाटील यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. यावेळी जिल्हाध्यक्ष संग्राम मोरे पाटील यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले. यावेळी इतरही पदाधिकाऱ्यांच्या निवडी जाहीर करण्यात आल्या.



महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे संघटक संजय भोकरे, प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे, राज्य समन्वयक नितीन शिंदे यांच्या आदेशान्वये तर प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी, प्रदेश उपाध्यक्ष अशोक देडे, डॉ. अभयकुमार दांडगे यांच्या सुचनेवरून नांदेड जिल्ह्याची उर्वरित कार्यकारिणी हॉटेल विसावा येथे घेतलेल्या बैठकीत सर्वांनुमते निश्चित करून जाहीर करण्यात आली. यामध्ये प्रामुख्याने पत्रकार संघाच्या नांदेड जिल्हा कार्याध्यक्षपदी दैनिक सकाळचे जिल्हा प्रतिनिधी रामेश्वर काकडे तर सरचिटणीसपदी मराठी अपडेटचे संपादक बापूसाहेब पाटील यांची निवड निश्चित करण्यात आली.

या निवडीसह जिल्हा उपाध्यक्षपदी दैनिक सत्य मराठीचे संपादक आयुब पठाण, महानगर सचिवपदी सकाळचे गौरव वाळंबे यांची निवड करण्यात आली.या निवडीचे नियुक्तीपत्र जिल्हाध्यक्ष संग्राम मोरे व लक्ष्मीकांत मुळे यांच्यासह जिल्हा पदाधिकारी यांच्या हस्ते देण्यात आले. या निवडीचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

## नांदेड येथे आज मातंग समाजाच्या राज्यस्तरीय बैठकीचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)**- नांदेड येथे आज सकल मातंग समाजाच्या महत्त्वपूर्ण राज्यस्तरीय बैठकीचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती पत्रकाद्वारे देण्यात आली आहे.

१ ऑगस्ट २०२४ रोजी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालाच्या अनुसूचित जातीचे उपवर्गीकरण राज्य सरकारने लवकरात लवकर करावे. त्या अनुषंगाने दि. २० मे २०२५ रोजी होणाऱ्या मुंबई आझाद मैदान येथे सकल मातंग समाजाच्या वतीने जनआक्रोश महाआंदोलनच्या नियोजनासाठी सकल मातंग समाज नांदेड जिल्ह्याच्यावतीने रविवार, दि. ४ मे रोजी कुसुम सभागृह नांदेड येथे सकाळी १० वाजता मातंग समाजाच्या राज्यस्तरीय बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

या बैठकीत महाराष्ट्रातील मातंग समाजाचे माजी मंत्री लक्ष्मणराव ढोबळे, रमेश बागवे, दिलीपराव कांबळे, उत्तम खंदारे, सर्व सामाजिक संघटनेचे प्रमुख विष्णू कसबे, सचिन साठे, अजिंक्य चांदणे, राजाभाई सूर्यवंशी, गणपत भिसे, सतीश कावडे, परिमल कांबळे, आ. सुनील कांबळे, अमित गोरखे, आ. जितेश अंतापूरकर, माजी आमदार अविनाश घाटे, रामभाऊ गुंडीले, नामदेव ससाणे, सुधाकर भालेराव, राजीव किसनराव आवळे, पृथ्वीराज साठे, राजू जयवंतराव आवळे, शासकीय समिती प्रमुख अशोक लोखंडे, राज्य समन्वयक सकल मातंग समाज महाराष्ट्र मारोती वाडेकर, संदीप धुपे, ॲड. राम चव्हाण, बाबुराव मुखेडकर, पंडित सूर्यवंशी, रणधीर कांबळे, कैलास डाखोरे, सुरेश साळवे, सुरेश पाटोळे, जोशीला लोमटे, संजय गायकवाड, भास्कर नेटके, शंकर कांबळे, गुलाब अण्णाभाऊ साठे, ॲड. रमेश शिंदे, डॉ. दिलीप अर्जुने व सर्व राजकीय पक्षातील प्रमुख पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत, असे कळविण्यात आले आहे. या महत्वपूर्ण बैठकीसाठी नांदेड जिल्ह्यातील मातंग समाज बंधु आणि भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन सकल मातंग समाजाच्यावतीने करण्यात येत आहे.

## मधुकरराव जोशी यांचे निधन

**नांदेड(प्रतिनिधी)** - सार्वजनिक बांधकाम विभागातील निवृत्त कर्मचारी व नांदेडच्या राधिकानगर येथील रहिवासी मधुकरराव तुकारामपंत जोशी (शास्त्री) यांचे शनिवारी सायंकाळी पुणे येथे निधन झाले. ते ८५ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, श्रीकांत व जयदीप जोशी ही दोन मुले, एक मुलगी, जावई, सुना, नातवंडे असा परिवार आहे. रविवारी सकाळी पुणे येथे त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.



## संदीप कळासरे यांना पालकमंत्र्यांच्या हस्ते जिल्हा युवा पुरस्कार प्रदान

**अर्धापूर(प्रतिनिधी)**-महाराष्ट्र दिनानिमित्त जिल्हा युवा पुरस्कार हा महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नांदेड यांच्यामार्फत दिला जातो. अर्धापूर येथील संदीप हरीभाऊ कळासरे यांना २०२४-२०२५ या वर्षासाठीचा जिल्हा युवा पुरस्कार पुरस्कार पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

यावेळी जिल्हाधिकारी राहुल कर्डीले, माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण, खा. डॉ. अजित गोपछेडे, पोलीस महानिरीक्षक शहाजी उमाप, आयुक्त महेश डोईफोडे, जि. प. मुख्याधिकारी श्रीमती मेघना कावली, जयकुमार टेंभरे यांची उपस्थिती होती.

जिल्हा युवा पुरस्कार हा समाजहितासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या युवक, युवती व नोंदणीकृत संस्थांचा गौरव करण्यासाठी आणि त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी हा पुरस्कार प्रदान केला जातो. संदीप कळासरे यांनी नांदेड परिसरातील अनेक ठिकाणी पर्यावरण संवर्धन, वृक्षारोपण आणि युवकांना सोबत घेऊन त्यांच्या गुणांना योग्य व्यासपीठ उपलब्ध करून दिले. उपक्रमाच्या माध्यमातून त्यांनी आदिवासी भागातील महिलांसाठी कार्य केले. युवकांसोबत घेऊन समाजातील इतर नागरिकांनाही प्रेरित करत सामाजिक क्षेत्रात भरीव योगदान दिले आहे. जिल्ह्यातील युवकांसाठी केलेले अतुलनीय कार्य उत्कृष्ट असून त्यांच्या या कार्याची दखल घेऊन त्यांना २०२४-२५ चा महाराष्ट्र शासनाचा जिल्हा युवा पुरस्कार जाहीर करण्यात आला. या पुरस्कारामध्ये १०,००० रोख रक्कम, सन्मानचिन्ह, गौरवपत्र, शाल-श्रीफळ आणि पुष्पगुच्छ यांचा समावेश होता. पुरस्कार वितरण समारंभात संदीप कळासरे यांनी हा सन्मान स्वीकारला आहे.



## चुलत भावाचा खून करून फरार झालेल्या आरोपीस तेलंगणातून पकडले

**माहुर (प्रतिनिधी)**- माहूर तालुक्यातील मौजे रुई येथे देशमुख कुटुंबातील सख्या चुलत भावाचा दोघा भावंडांनी शेतीच्या वादातून खून केल्याची घटना दि. १८ ऑगस्ट २०२४ रोजी घडली होती. या घटनेतील एका आरोपीला तात्काळ अटक करण्यात आली होती. तर अन्य एक आरोपी फरार होता. पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनी शिवप्रकाश मुळे, पोउपनी संदीप अनेबोईनवाड यांचेसह पोलिसांनी तेलंगणातून दि. २ रोजी अटक केली आहे.

माहूर तालुक्यातील मौजे रुई येथे दि. १८ ऑगस्ट २०२४ रोजी देशमुख कुटुंबियांच्या शेतीच्या वादावरून बैठक बोलावण्यात आली होती. यामध्ये गावातील सरपंच, उपसरपंच, तंटामुक्ती अध्यक्ष, पोलीस पाटील यांचेसह सर्व गावकरी उपस्थित होते. त्यांच्या समक्ष वाद निपटवण्यात आला होता. परंतु राहील बबलू देशमुख आणि सोहेल बबलू देशमुख यांनी वाद मिटल्यानंतर परवेज पंटुष देशमुख याला धरून सर्व गावकऱ्यांसमक्ष विळ्याने सपासप वार करून त्याचा खून केल्याची घटना घडली होती. पोलिसांनी राहील बबलू देशमुख यास अटक केली तर सोहेल बबलू देशमुख हा आठ महिन्यांपासून फरार होता. परवेजचे वडील फंटूश देशमुख यांनी पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप आणि पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांची भेट घेऊन आरोपीच्या नातलगाकडून धमक्या येत असल्याने फरार आरोपीस अटक करण्याची मागणी केली होती.

## नीट परीक्षा केंद्र परिसरात प्रतिबंधात्मक आदेश

**नांदेड (प्रतिनिधी)**- नीट परीक्षा २०२५ ही रविवार, दि. ४ मे २०२५ रोजी दुपारी २ ते संध्याकाळी ६ या कालावधीत नांदेड जिल्ह्यातील एकूण ५६ परीक्षा केंद्रांवर घेण्यात येणार आहे. या परीक्षा केंद्राच्या शंभर मीटर परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये प्रतिबंधात्मक आदेश जारी करण्यात आले आहेत.

परीक्षा केंद्राच्या परिसरात रविवार, दि. ४ मे २०२५ रोजी दुपारी १२ वाजेपासून ते रात्री ८ वाजेपर्यंतच्या कालावधीत परीक्षार्थी व परीक्षेच्या कामाशी संबंधित असलेले अधिकारी व कर्मचारी या व्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीस प्रवेश करता येणार नाही. तसेच यावेळेत परीक्षा केंद्राच्या परिसरातील शंभर मीटरपर्यंतच्या सर्व सार्वजनिक टेलिफोन्स, एसटीडी, आयएसडी, भ्रमणध्वनी, फॅक्स, झेरॉक्स, पेजर आणि ध्वनिक्षेपक चालू ठेवण्यास प्रतिबंध राहील, असे जिल्हादंडाधिकारी राहुल कर्डिले यांनी कळविले आहे.

## लहान मुलाला काम सांगण्याच्या कारणावरून जबर मारहाण

**नांदेड (प्रतिनिधी)**- आमच्या मुलाला दुचाकीवर नेऊन काम लावू नका, असे म्हणणाऱ्यास जबर मारहाण करण्यात आली. याप्रकरणी मुदखेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना २९ एप्रिल रोजी सकाळी नऊच्या सुमारास चिकाळा येथे घडली.

मुदखेड तालुक्यातील चिकाळा येथे राहणारा पंजाब गोविंद मोरे (वय ४२) च्या मुलाला गोपाळ उर्फ राजू मोहनराव परभणकर (वय ५०) याने दुचाकीवर नेऊन सामान आणण्याचे काम सांगितले होते. तेव्हा माझा मुलगा लहान आहे त्याला काम का सांगता असे विचारले असता त्याचा राग मनात धरून पंजाबराव मोरे यांचा भाऊ भगवान मोरे यास आणि पंजाबराव मोरे यांनाही जबर मारहाण करून जीवे करण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणी मुदखेड ते माळकौठा जाणारे रस्त्यावर गोविंद परभणकर यांच्या पान- टपरीच्या बाजूला मोकळ्या जागेत चिकाळा येथे ही घटना घडली. भगवान मोरे यास पोटात जबर दुखापत झाली असून, त्याच्यावर नांदेडच्या एका रुग्णालयात उपचार सुरू आहेत. पंजाबराव मोरे यांच्या फिर्यादीवरून मुदखेड पोलीस ठाण्यात गोपाळ उर्फ राजू मोहनराव परभणकर याच्याविरुद्ध खुनाचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस निरीक्षक वसंत सप्रे करत आहेत.

### नांदासौख्यभरे

**सावंत-अटकोरे**

**नांदेड**- येथील महावीर सोसायटीतील रहिवासी केवळाबाई भागोजी सावंत व चंद्रमुणी भागोजी सावंत यांचे ज्येष्ठ चिरंजीव शाम यांचा मंगलपरिणय सिडको येथील रहिवासी जमुनाबाई लालबाजी आटकेरे यांची नात व गौतमी संजय अटकोरे यांची सुकन्या अनुजा हिजसमवेत आज रविवार, दि. ४ मे, २०२५ रोजी दुपारी १२.१५ वाजता मातोश्री मंगल कार्यालय जुना पीव्हीआर मॉल रोड कौठा नांदेड येथे सानंद संपन्न होत आहे. वधू-वरांस हार्दिक शुभेच्छा.

-मुख्यसंपादक

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com